सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारताचे तेजस लढाऊ विमान कोसळले, दुबईत एअर शो दरम्यान मोठी दुर्घटना; अपघात कॅमेऱ्यात कैद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती**

भारतीय हवाई दलाच्या तेजस या लढाऊ विमानाचा भंयकर अपघात झाला. दुबईमध्ये सुरू असलेल्या एअर शो दरम्यान हा अपघात घडला. हवाई कसरती सादर करण्यासाठी तेजस हवेत झेपावले होते. मात्र, काही क्षणातच ते खाली कोसळले. जमिनीवर कोसळताच मोठा स्फोट झाला आणि आग आणि धुराचे लोळ उठले.

दुबईतील एअर शोमध्ये भारतीय हवाई दलाचे तेजस हे लढाऊ विमानही सहभागी झाले होते. चित्तथरारक प्रात्यक्षिक करून दाखवण्यासाठी ते आकाशात झेपावले होते. पण, कसरती करण्यापूर्वीच ते खाली कोसळले. ही घटना शुक्रवारी दुपारी २ वाजून १० मिनिटांनी घडली.

## चिमुकलीवर अत्याचार, लोकांच्या संतापाचा कडेलोट थेट न्यायालयात शिरण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मालेगाव**

मालेगाव तालुक्यातील एका गावात चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराचे तीव्र पडसाद उमटले. या घटनेच्या निषेधार्थ आणि आरोपीला तातडीने कठोरता कठोर शिक्षणा देण्याच्या मागणीसाठी मालेगाव बंद पाळण्याबरोबरच मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी न्यायालयातच शिरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांना लाठीचार्ज करत आंदोलकांना पांगवावे लागले. यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.



तीन वर्षाच्या मुलीवर एका २३ वर्षीय आरोपीने आधी अत्याचार केला आणि त्यानंतर तिची दगडाने ठेचून हत्या केली. या संशयित आरोपीला पोलिसांनी अटक केली. गुरुवारी (२० नोव्हेंबर) आंदोलकांनी पोलिसांची गाडी अडवून आरोपीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर शुक्रवारीही अशीच परिस्थिती निर्माण झाली.

मालेगाव बंदची हाक देत मोर्चा काढण्यात आला. यात मंत्री दादा भुसे यांच्यासह इतर पक्षांचे नेते आणि लोक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हा मोर्चा मालेगाव न्यायालयाच्या परिसरात आला. त्यानंतर आंदोलक आक्रमक झाले. आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी करत घोषणाबाजी करण्यात आली.

**आंदोलकांनी न्यायालयात शिरण्याचा केला प्रयत्न**

आंदोलक न्यायालयाच्या समोर आले. त्यानंतर काही आंदोलकांनी मुख्य प्रवेशद्वार आणि संरक्षण भिंतीवरून न्यायालयात शिरण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांना आवरणे नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी लाठीचार्ज सुरू केला. पोलिसांनी लाठीचार्ज केल्यानंतर आंदोलक न्यायालय परिसरातून पांगले. त्यामुळे परिसरात काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.या प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीला लोकांमुळे न्यायालयात आणण्याचे टाळण्यात आले. आरोपीला व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

**मनोज जरांगे पाटलांनीही व्यक्त केला संताप**

कोपर्डी बलात्कार प्रकरणातील आरोपीला आजतागायत फाशी झालेली नाही. आपण या प्रकरणात स्वतः सरकारपर्यंत जाऊन प्रश्न उपस्थित करणार आहोत. महाराष्ट्रात बालिकांवर अत्याचारांची मालिका सुरू असून, सरकारने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलनाचे पडसाद उमटतील, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर राज्य सरकारला दिला आहे.

## शरद पवार गट मुंबईत कोणाशी करणार युती, उद्धवसेना की काँग्रेस?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

एकीकडे मुंबई काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मुंबईत आघाडी करण्यासंदर्भात शरद पवार यांनी भेट घेतली असतानाच दुसऱ्या दिवशी गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी मुंबईत उद्धवसेनेबरोबर युतीचे संकेत दिले आहेत. त्यामुळे शरद पवार गट कोणाशी युती करणार, याबद्दल उत्सुकता वाढली आहे.

'आम्ही पुढच्या आठवड्यात युतीसंदर्भात चर्चा करणार आहोत. उद्धव ठाकरे यांच्यासोबतही चर्चा करून निर्णय घेणार आहोत. येत्या ८ दिवसात सगळे चित्र स्पष्ट होईल. आमची भूमिका सगळ्यांना एकत्र घेऊन जायची आहे', असे सुप्रिया सुळे माध्यमांशी बोलताना म्हणाल्या. उद्धवसेना आणि मनसेची मुंबई महापालिकेत युती होणार, हे स्पष्ट झाल्यानंतर काँग्रेसने आधी स्वबळाची घोषणा केली होती. त्यानंतर बुधवारी शरद पवार यांची भेट घेऊन आघाडी करण्यासंदर्भात चर्चा केली. सुप्रिया सुळेही या बैठकीला उपस्थित होत्या.



यासंदर्भात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची लवकरच सविस्तर चर्चा होणार आहे. अशातच सुप्रिया सुळे यांनी उद्धवसेनेबरोबर युतीचे संकेत दिले आहेत.


मुंबईत आतापर्यंत महापालिका निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी युती होत आली आहे. महाविकास आघाडीच्या स्थापनेनंतर ही पालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. उद्धव सेनेबरोबर युती करण्यास काँग्रेसला कोणतीच अडचण नव्हती. मात्र मनसे उद्धव सेनेबरोबर जाणार असल्याने काँग्रेसची खरी अडचण झाली आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रा ही देशाला एकजूट करण्यासाठी काढण्यात आली होती, अशा वेळी उत्तर भारतीयांविरोधात भूमिका घेणारा मनसे पक्ष ज्यांच्याबरोबर आहे त्यांच्यासोबत काँग्रेसने आघाडी केली तर राहुल गांधींच्या भूमिकेलाच छेद दिल्यासारखे होईल, असे काँग्रेसला वाटते. त्यामुळे उद्धव ठाकरेंशीही काँग्रेसला फारकत घ्यावी लागणार आहे. अशात शरद पवार गट उद्धव ठाकरेंबरोबर गेला तर काँग्रेसला मुंबईत एकट्यानेच लढावे लागेल.

## थेट घराच्या काचातून बिबट्याने मारली उडी, अन् पुढे पळ काढला

### न्यू तापडिया नगर परिसरातीळ घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अकोला**

शहराच्या न्यू तापडिया नगर भागात एका घराच्या टॉवरचे काच फोडून बिबट्याने थेट रस्त्यावर उडी मारल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी घडला. त्यानंतर बिबट्याने दुसरीकडे पळ काढला. या घटनेमुळे परिसरासह शहरात मोठी खळबळ उडाली असून दहशत पसरली आहे. वन विभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळावर धाव घेऊन बिबट्याची शोधाशोध सुरू केली. या घटनेची शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे.



> न्यू तापडिया नगर परिसरात बिबट्या आढळून आल्याची माहिती मिळाली. वन विभागाच्या पथकासह आम्ही घटनास्थळाची पाहणी केली. प्रथमदर्शनी बिबट्या येऊन गेल्याचे समजते. बिबट्याचा शोध घेतला जात आहे. नागरिकांनी सावध व सतर्क राहावे.
>
> **– बाळ काळणे, मानद वन्यजीव रक्षक, अकोला.**

राज्यातील वन्यजीवांची आता शहराकडे धाव आहे. विविध शहरांमध्ये सध्या बिबट्या आढळून येत आहे. बिबट्याच्या हल्ल्यामध्ये अनेक जण जखमी झाले असून काही जणांचे बळी देखील केले आहेत. त्यामुळे बिबट्याची चांगलीच दहशत पसरली. दरम्यान, अकोला शहरातील न्यू तापडिया नगर परिसरात सुद्धा शुक्रवारी बिबट्या दिसून आल्याची चर्चा आहे.

न्यू तापडिया नगर भागातील पोलीस कर्मचारी विलास बंकावार यांच्या घराच्या टॉवरचे काच फोडून बिबट्याने बाहेर उडी मारल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात प्रचंड दहशत पसरली. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरली.

बिबट दिसल्याचे कळतात वन विभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळावर धाव घेतली. वन विभागाच्या माहितीनुसार, बिबट्या आता या भागातून पुढे निघून गेलेला आहे. त्यामुळे धोका कमी झाला. नागरिकांनी सतर्क राहून सावधगिरी बाळगण्याचे आवाहन वन अधिकाऱ्यांनी केले आहे. वनविभागाची पथके परिसरात सतत पाहणी करीत आहेत. त्या घरापर्यंत बिबट्या नेमका कसा पोहचला? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या आगोदर ही न्यू तापडिया नगर भागात बिबट्या आढळून आल्याची चर्चा होती.

## ना वीज, ना रस्ते, ना पाणी ! मेळघाटातील दुर्गम २२ गावे मूलभूत सुविधांपासून वंचित

### हायकोर्टाकडून गंभीर दखल : राज्य सरकारला नोटीस, सहा आठवड्यांत मागितले उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नागपूर**

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा व धारणी तालुक्यामधील २२ गावांत वीज, पाणी, रस्ते, पक्की घरे इत्यादी मूलभूत सुविधा नसल्याचा दावा करणाऱ्या जनहित याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गुरुवारी गंभीर दखल घेऊन राज्य सरकारसह इतर प्रतिवादींना नोटीस बजावली आणि यावर सहा आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. याचिकेवर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. याचिकेतील प्रतिवादींमध्ये ग्राम विकास विभागाचे सचिव, ऊर्जा विभागाचे सचिव, वन व महसूल विभागाचे सचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव, आदिवासी विकास विभागाचे सचिव, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणचे महासंचालक, अमरावती जिल्हाधिकारी आदींचा समावेश आहे.



रंगूबेली गट ग्रामपंचायतीमधील कुटंगा, कुंड, धोकडा, खामदा-किन्हीखेडा, खोपमार यासह रायपूर, बोराटखेडा, रेट्याखेडा, मेळघाट इत्यादी २२ गावे दुर्गम क्षेत्रात असून या गावांना जलजीवन मिशन, हर घर बिजली, प्रधानमंत्री सौरऊर्जा, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व प्रधानमंत्री ग्रामीण आवास या कल्याणकारी योजनांच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे गावकऱ्यांचा सन्मानाने व सुरक्षितपणे जगण्याचा मूलभूत अधिकार हिरावला गेला आहे. ही याचिका अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे व विद्यार्थी प्रकाश पराते यांनी दाखल केली होती. न्यायालयाने काही तांत्रिक कारणांमुळे या दोघांची नावे वगळून ही याचिका स्वतः चालविण्याचा निर्णय घेतला व याचिकेचे कामकाज पाहण्यासाठी ॲड. निखिल कीर्तने व ॲड. पार्थ मालविया यांची न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली.

## काँग्रेसची उद्धव ठाकरेंना ऑफर, मनसे सोडा आणि आमच्यासोबत या...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडी पुन्हा एकदा रंगत आहेत. महाविकास आघाडीतून वेगळे पडलेल्या मुद्द्यांना आज पुन्हा नवी दिशा मिळू लागली आहे. काँग्रेसमधील काही वरिष्ठ नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना मनसेची साथ सोडून पुन्हा काँग्रेससोबत येण्याची ऑफर दिल्याची माहिती सूत्रांकडून समजते. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या काळात काँग्रेसला विश्वासात न घेता मनसेसोबत संपर्क वाढवल्याने काँग्रेसमध्ये निर्माण झालेली नाराजी अद्याप पूर्णपणे निवळलेली नाही. त्यामुळेच काँग्रेसने एकला चलो रेची तयारी सुरू केली होती. मात्र आता पुन्हा उद्धव ठाकरेंशी संवादाचे दरवाजे उघडण्याची तयारी दिसत आहे.

काँग्रेसने आधीच मुंबई महापालिका स्वतंत्रपणे लढण्याची भूमिका जाहीर केली आहे. तरीही सूत्रांच्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे जर मनसेसोबतची जाण्याची शक्यता संपुष्टात आणून काँग्रेससोबत आले, तर काँग्रेस स्वबळाबाबत पुनर्विचार करू शकते. मात्र त्यासाठी काही ठोस शर्तींची अट काँग्रेस ठेवू शकते, अशी चर्चा आहे. दुसरीकडे, मनसे या चर्चेने अजिबात विचलित झालेली नाही, असे दिसते. मनसे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, मनसे हा स्वतंत्र पक्ष आहे. आमचे निर्णय राज ठाकरे घेतील. इतर कोण काय म्हणतात याचा आमच्याशी संबंध नाही.

## संघाच्या स्वयंसेवकाला काँग्रेसची उमेदवारी! वंचितसह मुस्लीम समाज नाराज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१चंद्रपूर**

मागील काही वर्षात अंगावरील कपड्यासारखे पक्ष बदलणाऱ्या माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर व ड.सुनील नामोजवार या दोन स्वयंसेवकांचा भद्रावतीची जनता स्वीकार करेल काय असा प्रश्न आता सर्वत्र केला जात आहे. दरम्यान दोघांचेही स्वयंसेवकाच्या गणवेशातील छायाचित्र समाज माध्यमावर सार्वत्रिक होताच वंचित बहुजन आघाडी, काँग्रेसचे पारंपारिक मतदार तसेच मुस्लीम मतदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे.

भद्रावती नगर पालिका नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपाचे अनिल धानोरकर व



काँग्रेसचे सुनील नामोजवार या दोन माजी नगराध्यक्षांमध्ये लढत आहे. धानोरकर व नामोजवार या दोन्ही उमेदवारांमध्ये बरेच साम्य आहे. यातील एक साम्य म्हणजे दोघांनीही मागील काही वर्षात तीन ते चार वेळा पक्ष बदल केलेला आहे. काँग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर यांचे भासरे असलेल्या अनिल धानोरकर अगदी सुरूवातीला शिवसेनेत सक्रीय होते.सेनेत असतांनाच ते भद्रावतीचे नगराध्यक्ष झाले. त्यानंतर भाऊ दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या सोबत काँग्रेस पक्षात सक्रिय होते. २०२४ ची विधानसभा निवडणुक वंचित बहुजन आडीत प्रवेश करून लढविली आणि आता निवडणुकीच्या तोंडावर भाजपात प्रवेश केला. भाजपात प्रवेश करताच स्वयंसेवकाचा गणवेश प्रधान करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांना हजेरी लावून निष्ठावंत भाजपा कार्यकर्ता आणि संघ स्वयंसेवक असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र आता त्यांचे स्वयंसेवकाच्या गणवेशातील छायाचित्र समाज माध्यमावर सार्वत्रिक झाले असून सातत्याने पक्ष बदलणारा स्वयंसेवक निष्ठावान कसा असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## फडणवीस-एकनाथ शिंदेंमध्ये ना संवाद ना उत्साह, ना सहजता : महायुतीत तणाव शिगेला?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात तापलेले वातावरण हुतात्मा स्मारकावरील क्षणांमधूनच दिसून आले. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे एकमेकांच्या जवळ उभे असतानाही नेहमीचा संवाद, उत्साह आणि सहजता दिसली नाही. दोघांची तणावपूर्ण देहबोली पाहून महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र आणखी ठसठशीत झाले. हुतात्मा स्मारकावरील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आमनेसामने आले तरी दोघांची देहबोली मात्र पूर्णपणे बदललेली दिसली. औपचारिक नमस्कारानंतरही नजरा टाळणे, संवाद न घडणे आणि वातावरणातील ताण स्पष्ट जाणवत असल्याने महायुतीतील दुरावा आता उघडपणे समोर आल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहे.

भाजपच्या प्रदेश नेतृत्वात निर्माण झालेल्या हालचालींमुळे महायुतीतील तणाव



आणखी उफाळले असून, गेल्या काही दिवसांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे नेते रवींद्र चव्हाण यांच्यातील मतभेद प्रकर्षाने समोर आले आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेत सुरू असलेल्या फोडाफोडीबाबत रवींद्र चव्हाण यांच्याकडे लक्ष्य वेधले जात असताना, अखेर शिंदे यांनी स्वतः दिल्ली गाठून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेट दिली. या भेटीत त्यांनी तक्रारींचा सविस्तर तपशील मांडल्याचे समजते. मात्र, शाह यांनी परिस्थितीवर आपले लक्ष असल्याचे सांगून फारसा ठोस प्रतिसाद दिला नसल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा आहे. त्यामुळे शिंदे यांच्या नाराजीत आणखी वाढ झाल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.

दिल्लीतील बैठकीनंतर राज्यातील वातावरण शांत होईल, अशी अपेक्षा होती. मात्र त्याच्या उलट पुढीलच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी बिहारच्या शपथविधी सोहळ्यासाठी स्वतंत्र प्रवास केल्याची माहिती बाहेर आल्यानंतर राजकीय चर्चांना दुजोरा मिळाला. दोन्ही नेते एकत्र प्रवास न करणे, सोहळ्यात एकत्र न दिसणे आणि संपूर्ण कार्यक्रमादरम्यान जवळपास संवाद टाळला गेल्याचे समोर आले. महायुतीतील तणाव निवळण्याऐवजी आणखी वाढत असल्याचे हे लक्षण मानले जात आहे. विशेष म्हणजे फडणवीस आणि अजित पवार मात्र एकत्र दिसले, तर शिंदे यांची वेगळी उपस्थिती पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

मुंबईत परतल्यानंतरही या नाट्यात कोणतीच गोडी न आल्याचे दिसले. हुतात्मा चौकात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे आमनेसामने आले परंतु दोघांमधील औपचारिक नमस्कारात नेहमीचा उत्साह दिसला नाही.

## संपादकीय ......

# उदंड जाहले इच्छुक

साधारणत: एक लाख लोकवस्ती असलेल्या नगर परिषदेच्या गावामध्ये किती लोकांची नगरसेवक होण्याची इच्छा असेल याचा आपण अंदाज बांधू शकत नाही. लाखभर लोकांमध्ये किमान दहा हजार लोक असे असतात की, कधी ना कधी नगरसेवक होण्याचे त्यांचे स्वप्न असते. या दहा हजारांपैकी किमान १००० लोक गेली पाच वर्षे आपल्या वार्डातील जनतेला भेटेल तिथे नमस्कार करणे आणि जमेल तशी सेवा करणे, अशी कामे करत असतात. नगराध्यक्ष पदासाठी मात्र मातब्बर उमेदवार लागतात म्हणून आपण असा अंदाज बांधू शकतो की, शंभरेक लोक या पदासाठी इच्छुक असतील.

अर्ज दाखल करण्याची तारीख जाहीर झाल्याबरोबर मुहूर्त काढून वाजत-गाजत अर्ज दाखल केले जातात. मुहूर्त काढून देणार्या लोकांची पण या काळामध्ये चलती असते. विशिष्ट मुहूर्तावर अर्ज भरल्यानंतरच हमखास यश मिळणार, असा प्रत्येकाचा विश्वास असतो. अर्ज परत घेण्याचा दिवस जवळ येईपर्यंत त्यापैकी अर्धे-अधिक गळालेले असतात. काही लोकांवर माघार घेण्यासाठी दबाव टाकला जातो तर काही लोक अर्थपूर्ण तडजोडी करून माघार घेत असतात. असे करत करत साधारणत: एका छोट्याशा नगर परिषदेच्या गावात अंदाजे पंचवीस उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी आणि अंदाजे तीनशे उमेदवार नगरसेवक पदासाठी आपले अर्ज राखून प्रचाराला लागलेले असतात.

जनता हे सगळे मनोरंजन पाहात असते. कुणीही निवडून आला तरी आपल्या गावाच्या सौंदर्यात (?) काहीही फरक पडणार नाही आणि कितीही म्हटले तरी गाव स्वच्छ होणार नाही याविषयी जनतेची आता खात्री झालेली आहे. दरवर्षीच्या नगरसेवक पदाच्या निवडणुकीसाठी सगळ्यांचे आश्वासन एकच असते ते म्हणजे आपले शहर सुंदर आणि स्वच्छ करणार. रस्ते, नाला, पिण्याचे पाणी यांची चोख तरतूद करून देणार, आपला नगरसेवक आपल्याला २४ तास उपलब्ध असणार. अनेक निवडणुका पाहून तावून सुलाखून निघालेली जनता या सर्व प्रकाराला कंटाळली आहे. हे कोणीही लक्षात घेत नाही. आपल्या दुर्दशेचे दशावतार संपणार नाहीत. याविषयी जनतेच्या मनामध्ये काहीही शंका उरलेली नाही.

तरीही नव्या दमाने निवडणुका लढवल्या जातात. जनता आपसात नव्याने चर्चा करत राहते. याचे कारण म्हणजे आपल्या जनतेला राजकारणामध्ये नको इतका इंटरेस्ट आहे. कोणीही निवडून आल्यानंतर फरक पडणार नसेल तर इतकी उत्सुकता तरी कशासाठी ठेवायची, हा एक प्रश्न आपल्यासारख्या सामान्य लोकांच्या मनात उभा राहतो. एकदा का निवडणूक संपली की, पराभूत झालेला उमेदवार पुन्हा आपल्याला नमस्कार करत नाही आणि निवडून आलेला उमेदवार आपल्याला दिसत नाही हे शाश्वत सत्य आहे हे आजवर सिद्ध होत आले आहे.

# हिवाळ्यात डाळिंब बागेसाठी गोणपाट, साडी की शेडनेट वापरावे, वाचा सविस्तर

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक** - थंडीच्या दिवसात डाळिंबाच्या बागेची काळजी घेणे महत्त्वाचे असते, कारण अति थंडीमुळे झाडांची पाने जळू शकतात आणि फळे तडकण्याची शक्यता असते. या काळात डाळिंब बागेचे संरक्षण कसे करावे, पाणी कधी आणि किती अंतराने द्यावे, यासह काय काळजी घ्यावी, हे समजून घेऊयात....

डाळिंब बागेत धूर किंवा बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षण करावे. थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे.

**सिंचन-** सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. झाडाजवळचे २० टक्के क्षेत्र ओलिताखाली येणे गरजेचे असते. त्यापेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली आल्यास,




बागेत सूक्ष्म वातावरण तयार होऊन खोडांना लहान छिद्रे पाडणारे भुंगेरे व मर रोग यांचा प्रादुर्भाव वाढतो. खोडकिडीचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी डाळिंबाला हलक्या जमिनीत चार खोडे ठेवन वळण देणे योग्य ठरते.

पाणी देणे : बागेला मोकाट सिंचन पद्धतीने पाणी द्यावे. यामुळे जमिनीतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते.

धूर करणे : ज्या बागेमध्ये बहर धरलेला आहे आणि फळांची वाढ होत आहे, अशा ठिकाणी पहाटेच्या वेळी धूर करावा. बागेतील तोडलेल्या फांद्या, कचरा जाळून हा धूर तयार करता येतो.

आच्छादन : थंडी आणि धुक्यापासून बचावासाठी बागेला जाळी किंवा पातळ कापडाचे आच्छादन घालता येते.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला धक्का अनिल देशमुख यांचे पुत्र सलिल देशमुख यांचा राजीनामा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई-** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू झाल्या आहेत. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकांची चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मोठा धक्का बसला आहे. माजी मंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांनी पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. सलील देशमुख यांनी प्रकृतीचे कारण देऊन पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. देशमुख यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांना राजीनामा पाठवला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा देण्यात आला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत.दरम्यान, त्यांना दुसऱ्या पक्षात प्रवेश करणार आहात का ? असा प्रश्न विचारण्यात आला, यावेळी त्यांनी उद्याची परिस्थिती काय असेल ते माहित नाही. मात्र सध्या प्रकृतीच्या कारणांनी मी राजीनामा देत आहे, असंही ते म्हणाले. त्यांनी गेल्या ५ महिन्यांपासून प्रकृतीच्या कारणामुळं राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा राजीनामा देत आहे, असं जाहीर केले.दरम्यान, आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. माजी मंत्री अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख दुसऱ्या कोणत्या पक्षात प्रवेश करणार आहेत का? अशा चर्चा सुरू आहेत.




## थंडीत गूळ, तीळ आणि शेंगदाणे का खावेत? जाणून घ्या वैज्ञानिक कारण

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

भारतामध्ये विशेषत: थंडीच्या दिवसांत गूळ, तीळ आणि शेंगदाणे (शेंगदाणा) यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मकरसंक्रांतीच्या काळात तर 'तिळगूळ घ्या गोड गोड बोला' म्हणत या तिन्ही पदार्थांचे लाडू किंवा वड्याच्या स्वरूपात सेवन करण्याची परंपरा आहे. मात्र, हा केवळ समारंभाचा पदार्थ नसून, थंडीच्या दिवसांत शरीराला नैसर्गिकरित्या ऊर्जा, उष्णता आणि ताकद देणारे हे एक प्रभावी औषधच आहे. या तिन्ही पदार्थांचे वैज्ञानिक आणि आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.

गूळ : नैसर्गिक उष्णता आणि लोहाचा साठा


गूळ हे साखरेला एक उत्तम आणि आरोग्यदायी पर्याय आहे. थंडीत गूळ खाण्याचे फायदे:

नैसर्गिक उष्णता: गुळाची प्रकृती उष्ण असते. हिवाळ्यात गूळ खाल्ल्याने शरीराचे तापमान नियंत्रित राहते आणि थंडीपासून बचाव होतो.

लोहाचा मोठा स्रोत (खीप डेंीलश): गूळ हा लोहाचा एक चांगला स्रोत आहे. लोहामुळे शरीरातील हिमोग्लोबिन वाढते, ज्यामुळे अशक्तपणा दूर होतो.

पचनक्रिया सुधारते: जेवणानंतर थोडा गूळ खाल्ल्यास पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

श्वसनमार्गाची स्वच्छता: गूळ खाल्ल्याने फुफ्फुसे आणि श्वसनमार्ग स्वच्छ राहतो, ज्यामुळे सर्दी आणि खोकल्यामध्ये आराम मिळतो.



तीळ .. कॅल्शियम आणि उष्णतेचा पॉवरहाऊस

तिळाचा वापर फक्त लाडवांपुरता मर्यादित नाही. तिळातून मिळणारे फायदे थंडीसाठी महत्त्वाचे आहेत:

कॅल्शियमचा साठा: तिळामध्ये कॅल्शियम मुबलक प्रमाणात आढळते. हे हाडे मजबूत करण्यासाठी आणि संधिवात सारख्या थंडीत वाढणाऱ्या समस्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक आहे.

शरीरासाठी ऊर्जा: तिळात आरोग्यदायी फॅट्स आणि प्रथिने असतात, जे शरीराला दीर्घकाळ ऊर्जा देतात.

नैसर्गिक तेल: तिळात नैसर्गिक तेल असते, जे त्वचा आणि केसांना थंडीत येणाऱ्या कोरडेपणापासून वाचवते.

रोगप्रतिकारशक्ती: तिळात असलेले झींक आणि सेलेनियम रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात.

शेंगदाणे : प्रथिनांचे केंद्र आणि फॅट्सचा स्रोत

शेंगदाणे हे गरीबांचा बदाम म्हणून ओळखले जातात आणि ते ऊर्जेचा एक स्वस्त आणि प्रभावी स्रोत आहेत:

उच्च प्रथिने (क्ळसह झ्ीींशळप): शेंगदाणे हे प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्रोत आहेत, जे स्नायूंची वाढ आणि दुरुस्ती करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

आरोग्यदायी फॅट्स: शेंगदाण्यात असणारे असंतृप्त फॅट्स हृदयासाठी चांगले असतात. हे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात.

थंडीत उष्णता: गूळ आणि तिळाप्रमाणे शेंगदाणे देखील शरीराला नैसर्गिकरीत्या उष्णता देतात, ज्यामुळे थंडीचा सामना करणे सोपे होते.

व्हिटॅमिन आणि मिनरल्स: शेंगदाण्यात व्हिटॅमिन ई, नियासिन आणि मॅग्नेशियम यांसारखी आवश्यक पोषक तत्वे असतात.

आहारात समावेश कसा कराल?

तिळगूळ लाडू/वड्या: रोजच्या आहारात तिळगूळ लाडू किंवा वडीचा समावेश करा.

शेंगदाणे: भाजलेले शेंगदाणे किंवा शेंगदाणा चिक्की खावी.

गूळ: चहामध्ये साखरेऐवजी गूळ वापरा किंवा जेवणानंतर छोटा खडा खावा.

या त्रिकुटाचे सेवन केल्याने थंडीच्या काळात येणारा आळस दूर होतो आणि शरीर निरोगी राहते.

# धारणी उप-जिल्हा रुग्णालयात माता आणि बालकांच्या मृत्यूच्या घटनांबाबतआरोग्य विभागाचा खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती,** धारणी उप-जिल्हा रुग्णालयात नुकत्याच घडलेल्या माता आणि बालकांच्या मृत्यूंच्या घटनांची गांभीर्याने दखल घेत, आरोग्य विभागाने तात्काळ प्राथमिक चौकशी पूर्ण केली आहे. या चौकशीद्वारे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आरोग्य सेवा प्रणालीतील त्रुटी आणि सुधारणा आवश्यक असलेल्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र धुळघाट रेल्वे उपकेंद्र वारा तांडा अंतर्गत ग्रामसलाईबर्डी येथील रहिवासी असलेल्या २० वर्षीय नर्मदा नारायण चिलावे यांना १५ नोव्हेंबर रोजी पोटदुखीमुळे धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासण्या, नियमित व सामान्य होत्या. यावेळी मातेला कळा कमी असल्याने त्यांना दोन तास प्रसूती कक्षात फिरण्यास सांगितले. कळा वाढल्यावर टेबलवर घेऊन सलाईन लावण्यात आले. यावेळी प्रसुतीसाठी जोर देण्यास सांगितल्यावर मातेला अचानक झटके आले, डोळे पांढरे झाले, जीभ बाहेर आली आणि तोंडातून फेस आला. सायंकाळी ६:४५ ते ७ वाजता दरम्यान मातेचा मृत्यू झाला. दाखल होताच तिला सलग झटके आल्याने तिची प्रकृती अति गंभीर झाली होती आणि प्रसूतीपूर्वीच तिचा मृत्यू झाला. प्राथमिक आरोग्य केंद्र सादरावाडी अंतर्गत उपकेंद्र भोकरवर्डी येथील रहिवासी असलेल्या २५ वर्षीय कविता श्रीराम धोंडे यांची १३ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसूती कळा सुरू झाल्याने त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात आणले जात असताना, रुग्णालयाच्या आवारात सायंकाळी ६:५० वाजता त्यांची प्रसूती झाली. त्यांना २.५ किलोग्रॅम व २.१ किलोग्रॅम वजनाची जुळी बाळे जन्माला आली. जन्मलेल्या दोन्ही बाळांना एस.एन.सी.यु. मध्ये भरती करण्यात आले होते. परंतु, दि. १५ नोव्हेंबर रोजी एका बाळाचा मृत्यू दूध फुफ्फुसात जावून श्वसन थांबल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले. पहिल्या बाळाच्या मृत्यूनंतर माता व दुसऱ्या बाळाला सुट्टी देण्यात आली. रुग्णवाहिकेने धुळघाटला जात असताना रुग्णवाहिकेतच दुसऱ्या बाळाचा मृत्यू झाल्याचे नातेवाईकांना समजले. चौकशी व निष्कर्षानुसार, दुसऱ्या बाळाचा मृत्यू रक्तातील साखर व शरीराचे तापमान कमी झाल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली

# शेतकऱ्यांनी ई-केवायसी आणि ग्रीस्टॅक नोंदणी त्वरित पूर्ण करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती,** अमरावती जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे बाधित झालेल्या ५ लाख ६९ हजार शेतकऱ्यांच्या मदतीचा महत्त्वपूर्ण डेटा ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड केला आहे. या नुकसानीपोटी आतापर्यंत ५४२ कोटी रुपयांचा निधी वाटप करण्यात आला आहे.

या निधीचा लाभ संबंधित शेतकऱ्यांपर्यंत सुरळीत पोहोचवण्यासाठी आणि केंद्र व राज्य सरकारच्या भविष्यातील सर्व योजनांसाठी पात्र होण्यासाठी, जिल्हा प्रशासनाने सर्व शेतकऱ्यांना ई-केवायसी त्वरित पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. ई-केवायसी सुविधा पूर्ववत सुरू झाली असल्यामुळे, ज्या शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत ई-केवायसी केलेली नाही, त्यांनी तात्काळ आधार कार्डसह आपल्या जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रा'वर जाऊन ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच, ज्या शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही,

त्या सर्व शेतकऱ्यांनी आपला गाव नमुना नं. ७/१२ उतारा व आधार कार्डसह आपले सरकार सेवा केंद्रावर जावून नोंदणी करून 'फार्मर आयडी' प्राप्त करून घ्यावा. जिल्हा प्रशासनाच्या या आवाहनानुसार, सर्व शेतकऱ्यांनी तातडीने या प्रक्रिया पूर्ण करून पुढील शासकीय योजनांच्या लाभासाठी पात्र व्हावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविण्यात आले आहे.

# महाविस्तार मोबाईल ॲपचा वापर करावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती-** शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित महाविस्तार हे आधुनिक मोबाईल ॲप विकसित केले असून, शेतकऱ्यांना डिजिटल सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी हे ॲप अत्यंत उपयुक्त आहे. तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती व विकासासंदर्भात तांत्रिक सल्ला, हवामान अंदाजबाबत माहिती या ॲपद्वारे सुलभरित्या उपलब्ध होते. यानुषंगाने शेतकरी बंधुनी महाविस्तार मोबाईल ॲपचा वापर करावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या ॲपद्वारे पिकांसंबंधी तांत्रिक सल्ला, हवामानाचा अचूक अंदाज, मृदा आरोग्यपत्रिका, खतमात्रा गणक, किड व रोग ओळख व त्यांचे व्यवस्थापन, शेती मालाचे बाजारभाव तसेच विविध कृषी शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे. स्थानिक शेतीविषयक माहितीही या ॲपमध्ये उपलब्ध करण्यात आली आहे. महाडीबीटी प्लॅटफॉर्मला महाविस्तार ॲपशी जोडण्यात आले असून भविष्यात कृषी विभागाच्या सर्व सेवा व योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना हे एकच ॲप वापरावे लागणार आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी हे मोबाईल ॲप डाउनलोड करून वापर करणे अत्यंत आवश्यक आहे, असे कृषी विभागाद्वारे कळवण्यात आले आहे.-

# पारस विटाळकरची राष्ट्रीय बास्केटबॉल संघात निवड

## सलग तिसऱ्यांदा मिळाली संधी, अमरावतीला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

अमरावती येथील आघाडीचा बास्केटबॉल खेळाडू पारस विटाळकर याची १७ वर्षांखालील राष्ट्रीय बास्केटबॉल संघात सलग तिसऱ्यांदा निवड झाली आहे. पोलीस कर्मचारी विजय विटाळकर यांचा मुलगा असलेल्या पारसच्या या निवडीमुळे अमरावती शहराला क्रीडा क्षेत्रात नवी ओळख मिळाली आहे.सातारा जिल्ह्यातील कोल्हापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय शालेय बास्केटबॉल क्रीडा स्पर्धेत अमरावतीच्या बास्केटबॉल संघाने कांस्यपदक पटकावले होते. .अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक या संघाने राज्य स्पर्धेत नागपूर विभागाला ५९-५८ आणि नाशिक विभागाला ६७-४३ अशा फरकाने हरवून राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. पारस विजय विटाळकर याने प्रत्येक सामन्यात तब्बल ३० ते ४० गुण मिळवून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तो येथील टायटन्स स्कूलचा विद्यार्थी असून, नैतिक देशमुख, राज चौकंडे,



वंश राठी, यश पळसपगार, हरतेज माथरू, अर्चित खंडारे, सोहम धोटे, दीपा जीना आणि अमितेश गुजर या सहकाऱ्यांनीही त्याला चांगली साथ दिली.या यशाबद्दल अमरावतीचे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी पारसचे कौतुक केले आहे. तसेच, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, टायटन्स पब्लिक स्कूलचे अध्यक्ष नितीन धांड, प्राचार्य डॉ. अजय चौबे, अमरावती बास्केटबॉल संघटनेच्या अध्यक्ष माधुरीताई चेंडके अभिनंदन केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# आता चुकीला माफी नाही; प्रत्येक मुद्रांक दस्ताची तपासणी होणारच !

## गैरवापर रोखण्यासाठी नियम : प्रत्येक महिन्याला सादर करावा लागणार अहवाल

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती** मुद्रांक शुल्कातील माफी किंवा सवलतीचा गैरवापर रोखण्या साठी नोंद व मुद्रांक विभागाने कडक उचलली आहेत. महसुलाची होणारी संभाव्य हानी टाळण्यासाठी माफी मिळालेल्या प्रत्येकदस्ता ची दरमहा अनिवार्य तपासणी करण्याचे निर्देश राज्य शासनाने सर्व दुय्यम निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. शुल्क माफीच्या प्रकरणात काही ठिकाणी अनियमितता दिसून येत असल्याच्या तक्रारीनंतर विभागाने यंत्रणा अधिक कडक केली आहे. प्रत्येक कार्यालयाने आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व माफी



दस्तांचे बारकाईने परीक्षण करणे आवश्यक झाले आहे. यापुढे शुल्कमाफी मिळालेल्या कोणत्याही दस्तास 'स्किप' करता येणार नाही. दस्ताच्या पात्रतेपासून ते प्रत्यक्ष लाभार्थीपर्यंत सर्व बाबींची तपासणी करून अहवाल सादर करावा लागणार आहे.अहवाल सादर न करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. समाजो पयोगी उपक्रमांसाठी जमिनीची खरेदी होत असेल तर, अशा प्रकरणांत मुद्रांक माफी केली जाते. मात्र, याचा गैरफायदा घेतला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे माफी किंवा सूट प्रकरणाची तपासणी मुद्रांक विभागा मार्फत होणार आहे. तपासणीदरम्यान पात्र नसलेल्या व्यक्तींना माफी देणे, चुकीचे मूल्यांकन, नियमांतील तफावत आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच लाभार्थीवर आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. यूजीसीच्या आदेशाचे पालन करणार नसतील तर संबंधित महाविद्यालयांविरुद्ध कठोर दंडात्मक कारवाई होऊ शकते. संस्थेची मान्यता रद्द करण्याची कारवाई देखील गंभीर प्रकरणात होऊ शकते. त्यामुळे संस्थांनी विद्यार्थ्यांची अडवणूक करू नये.

### कार्यालयाला ५ तारखेपर्यंत दस्त पाठवणे अनिवार्य

प्रत्येक कार्यालयाने मागील महिन्यात दिलेल्या माफी दस्तांची यादी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्यांकडे पाठवावी लागणार आहे.यापुढे विलंब केल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होऊ शकते.

### दर महिन्याला तपासणी करावी लागणार

दस्तांची तपासणी वर्षातून एक-दोनदा न होता दर महिन्याच्या आधारावर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अनियमितता किंवा चुकीचे दस्त तत्काळ लक्षात येतील, असा विभागाचा विश्वास आहे. त्यासाठीच प्रत्येक महिन्याला अहवाल सादर करणे आवश्यक केले आहे. जिल्हास्तरावर अंतिम तपासणीची जबाबदारी जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्याऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.

# लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक द्या, सरकारी अधिकाऱ्यांसाठी शासन निर्णय जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१मुंबई**



विधानमंडळ आणि संसद सदस्यांबाबत सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. विधानमंडळ आणि संसद सदस्यांना सन्मानाची आणि सौजन्याची वागणूक देण्यासाठी राज्य सरकारनं यापूर्वीही २७ जुलै २०१५ तसंच फेब्रुवारी २०२० मध्ये शासन निर्णय काढण्यात आला होता. परंतू त्या निर्णयाचे आणि आता या सर्व निर्णयाचे विधीमंडळ आणि संसद सदस्यांना सन्मानाची आणि सौजन्याची वागणूक देण्याबाबत एकत्रित सुधारित मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली असून, याबाबत राज्य सरकारनं गुरुवारी (२० नोव्हेंबर) नवीन शासन निर्णय जारी केला आहे.

सर्व शासकीय कार्यालयांना सूचना : दरम्यान, महाराष्ट्र शासन हे सुशासन, पारदर्शकता आणि कार्यक्षमता यांना सर्वोच्च प्राधान्य देत आहे. सुशासनाच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून लोकप्रतिनिधींना सन्मानपूर्वक वागणूक आणि त्यांच्या पत्रव्यवहारावर त्वरित कार्यवाही, शासकीय कार्यक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करणे आणि माहिती व पारदर्शकता यांचा प्रभावी समन्वय घडवून आणणे तसंच लोकप्रतिनिधींशी होणारा संवाद अधिक सुलभ, सुसंगत आणि परिणामकारक करणे, शासकीय व्यवहार अधिक सुसूत्र, उत्तरदायी आणि विश्वासार्ह करणे, याकरिता सन्माननीय विधानमंडळ सदस्य, संसद सदस्यांना सन्मानाची आणि सौजन्याची वागणूक मिळण्यासंदर्भात सर्व मंत्रालयीन प्रशासनिक विभाग, त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, जिल्हा प्रमुख, कार्यालय प्रमुख शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, संस्था, मंडळे, महामंडळे, शासन नियंत्रित आणि तत्सम संस्थांमधील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत, असं आजच्या शासन निर्णयात म्हटलं आहे.

तर शिस्तभंगाची कारवाई : दरम्यान, या मार्गदर्शक तत्त्वांची, सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. वरील सर्व सूचनांचे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी काटेकोरपणे पालन करावे. सूचनांचे उल्लंघन, टाळाटाळ, कुचराई केल्याचं निर्दशनास आल्यास त्याची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांविरूद्ध, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (२) व (३) अनुसार तसंच, महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, असं शासन निर्णयात म्हटलं आहे.

# कॉलेजमधील 'ॲडमिशन' रद्द केली; 'फी' परत भेटली का ?

## विद्यार्थ्यांची अडवणूक थांबणार : उच्चशिक्षण संस्थांना बसणार चाप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती**

'यूजीसी'ने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचे शुल्क परतावा धोरण मागील वर्षाप्रमाणेच कायम ठेवले आहे.



विद्यार्थ्याने ३० सप्टेंबरपूर्वी प्रवेश रद्द केल्यास संबंधित संस्थांना पूर्ण शुल्काचा परत कराव लागेल.

३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत प्रवेश रद्द केल्यास एक हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम प्रक्रिया शुल्क म्हणून आकारून उर्वरित शुल्क परत करावे लागेल. हे धोरण २०२५-२६ शैक्षणिक सत्रासह 'यूजीसी'चे संशोधन होईपर्यंत पुढील सत्रासाठीदेखील लागू राहणार आहे.एखाद्या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्यापेक्षा मोठे कॉलेज किंवा कोर्स मिळाला तर विद्यार्थी आपला पहिला प्रवेश रद्द करतात. अशावेळी अनेक महाविद्यालय भरलेले शुल्क परत न करता विद्यार्थ्यांची अडवणूक करतात. तर काही महाविद्यालये गरजेपेक्षा जास्त पैसे कपात करतात. त्यामुळे 'यूजीसी'ने प्रवेश रद्द केल्यास शुल्क परत करा, असे निर्देश महाविद्यालयांना दिले आहेत.प्रलंबित प्रकरणांसाठी यूजीसीने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार तरतूद लागू राहणार आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या वतीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

### मनमानीला ब्रेक लागणार

'यूजीसी'च्या नव्या आदेशानुसार महाविद्यालयांच्या मनमानीला चाप बसणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांची पूर्ण फीस परत मिळू शकणार आहे.

### विद्यार्थ्यांनी तक्रार कुठे, कशी करायची ?

प्रवेश रद्द केल्यास भरलेली फीस परत न मिळाल्यास क्षेत्रीय विद्यापीठ, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अर्जाद्वारे ऑनलाइन तक्रार करता येते. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जावे.

# वाठोडा शुक्लेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रात विध्वंस

## अज्ञातांनी काचा फोडून शेणफेक; परिसरात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१भातकुली-**

भातकुली तालुक्यातील खोलापूर अंतर्गत वाठोडा शुक्लेश्वर येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य पथक केंद्रात अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केंद्राच्या इमारतीच्या खिडक्यांच्या काचा फोडून आतमध्ये शेणफेक करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.याआधीही याच प्रकरणासंदर्भात वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन खोकले यांनी खोलापूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिल्याची माहिती असून, त्या तक्रारीवर कोणतीही दखल न घेतल्याने प्रकार पुन्हा सुरू झाल्याची चर्चा ग्रामस्थांत रंगात आहे.

घटनास्थळी दिसलेल्या स्थितीनुसार, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत मद्यधुंद टवाळखोरांनी शासकीय इमारतीलाच लक्ष्य केले असल्याचे संकेत मिळत आहेत. आरोग्य केंद्र गावापासून काही अंतरावर असल्याने येथे टवाळखोरांची गर्दी वाढली असून, मद्यपानासाठी हा परिसर 'हॉटस्पॉट' बनल्याची स्थानिकांची व्यथा आहे.सकाळी कर्मचारी आरोग्य केंद्रात पोहोचले असता खिडक्यांच्या तुटलेल्या काचा, तसेच प्रवेशद्वाराजवळ शेणफेक झाल्याचे अंगावर येणारे चित्र दिसून आले. शासनाने नागरिकांच्या आरोग्य सोयीसाठी लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या इमारतीची अशी दुरवस्था होत असल्याने ग्रामस्थांत रोष आहे.



घटनेची माहिती मिळताच सरपंच मोहम्मद रिजवान यांनी रुग्णालयाची पाहणी केली. काचा फुटलेल्या अवस्थेत आणि घाणफेक झालेली स्थिती पाहून त्यांनी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायतीमार्फत पोलीस तक्रार दाखल कली.

# घरातून आत्महत्येच्या विचाराने बाहेर पडलेल्या तरुणीस पोलिसांनी वाचवले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती**

घरगुती भांडणाच्या रागात तरुणी घराबाहेर पडली. ती रेल्वे मार्गाकडे जात असतानाच कर्तव्यावरील एका वाहतूक पोलिसाने तरुणीला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र ती ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्या पोलिसाने तरुणीला थांबवून ठेवत ही माहिती तत्काळ 'डायल ११२' ला दिली. या माहितीच्या आधारे राजापेठ पोलिसांनी तातडीने गद्रे चौक भागातील रेल्वे मार्गावर धाव घेतली. तरुणी आत्महत्येसारख्या विचारात मग्न होती. त्यावेळी पोहचलेल्या पोलिसांनी तिची समजूत काढत तरुणीच्या नातेवाईकांचा शोध घेतला. त्यानंतरसायंकाळी सात वाजताच्या सुमारास नातेवाईकांच्या स्वाधिन केले. राजापेठ चौकात (गद्रे चौक) वाहतूक पोलिस देशमुख हे गुरूवारी सायंकाळी कर्तव्य बजावत होते. सायंकाळी सहा ते सच्चा सहा वाजताच्या सुमारास त्यांना एक तरूणी 'डिस्टर्ब' स्थितीत राजापेठ भागातील रेल्वे मार्गाच्या दिशेने जाताना दिसली. त्यांनी तरुणीला थांबवले. मात्र ती पोलिसांच्या समजावण्याला ऐकत नव्हती. त्यावेळी तरुणी स्वतः सोबतच जे काही बोलत होती, त्यावरुन ती घरगुती वादाचा राग मनात धरून बाहेर पडल्याचे वाहतूक पोलिस देशमुख यांच्या लक्षात आले.

त्यांनी तिला थांबवून तत्काळ डायल ११२ला माहीती दिली. त्यानुसार डायल ११२ चे अंमलदार प्रशांत अधाव यांनी ती माहिती तातडीने राजापेठ पोलिसांना दिली. यावेळी राजापेठचे ठाणेदार पुनित कुलट यांना माहीती मिळताच त्यांनी तत्काळ अंमलदार विवेक चेचरे, अमोल देशमुख, सहदेव बावणे व पुजा चंदनपत्रे यांना तत्काळ गद्रे चौक परिसरात जाण्याबाबत सुचवले, त्यानंतर त्या पोलिसांनी घटनेचे गांभिर्य लक्षात घेता क्षणाचाही विलंब न दवडता तत्काळ राजापेठ चौक गाठला. पोलिसांनी तरुणीची समजूत काढून तीच्या कुटुंबीयांसोबत संपर्क करून त्यांना घटनस्थळी बोलावले. त्यानंतर तरुणीला परिवाराच्या ताब्यात देण्यात आले.-

# शहराच्या २२ प्रभागांमधून ६ लाख ७७ हजार १६७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## सर्वाधिक ४० हजार ५९ मतदार प्रभाग क्र. २० सुतगिरणी मध्ये

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१अमरावती**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अमरावती महानगर पालिका निवडणुकीसाठी मनपाच्या निवडणूक विभागाद्वारे प्रारूप मतदार यादीची घोषणा करण्यात आली असून त्यानुसार यंदा शहराच्या २२ प्रभागांमधून ६ लाख ७७ हजार १६७ मतदार मतदान करणार आहेत. यात पुरुष मतदारांची संख्या ३ लाख ३९ हजार १६७, महिला मतदारांची संख्या ३ लाख ३७ हजार ९३२ व इतर मतदारांची संख्या ६८ आहे. प्रारूप मतदार यादीनुसार सर्वाधिक ४० हजार ५९ मतदार हे प्रभाग क्र. २० सुतगिरणी-सामरानगर तर सर्वात कमी १९ हजार ७४ मतदार हे एसआरपीएफ-वडाळी प्रभागात आहेत. राज्य निवडणूक आयोगाने अधिसुचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ही प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. २० नोव्हेंबरपासूनच हरकती व सूचना मागवण्याची मुदत सुरू झाली असून अंतिम मुदत ही २७ नोव्हेंबर आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी ही ५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.तर १२ डिसेम्बर रोजी मतदार केंद्रानिहाय यादी प्रसिद्ध होईल.



### यंदा १ लाख ६४ हजार मतदार

२०१७ मध्ये झालेल्या महानगर पालिका निवडणुकीत ५ लाख १२ हजार ६४८ मतदार मनपा क्षेत्रात होते. तर यंदा प्रारूप मतदार यादीनुसार मतदारांची संख्या ही ६ लाख ७७ हजार १६७ पर्यंत वाढली आहे. यंदा १ लाख ६४ हजार ५१९ मतदार वाढले आहेत.

# पाच जणांचा समावेश; दोघांना अटक, तिघे अल्पवयीन

## कार फोडल्याच्या रागातून मित्रांनी केला यशचा खून

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१अमरावती**

दोन ते तीन महिन्यांपूर्वी मित्राची कार फोडल्याच्या वचपा काढण्याच्या उद्देशाने विलासनगर परिसरात यश पाटणकर या तरुणाचा खून करण्यात आला. हा उलगडा शहर पोलिसांनी केला आहे. त्या खूनप्रकरणी, गुरुवारी (दि. २०) दोघांना अटक केली. तर तीन अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले.स्थानिक विलासनगर परिसरात यश रवींद्र पाटणकर (वय २४) या तरुणाचा बुधवारी रात्री तिघांनी चाकूने वार करून खून केला होता. घटनेनंतर काही तासातच दोन मारेकऱ्यांना गाडगेनगर व गुन्हे शाखेच्या



पथकाने अटक केली. तर, दोन अल्पवयीनांना गुन्हे शाखेने तर एकाला ताब्यात घेतले. याप्रकरणी, गाडगेनगरपोलिसांनी मृतक तरुणाची आई ममता पाटणकर (५०, रा. संविधान चौक, विलासनगर) यांच्या तक्रारीवरून २० नोव्हेंबरला पहाटे चौघांविरुध्द खुनाचा गुन्हा दाखल केला. चौकशीदरम्यान यात आणखी एकाचा सहभाग आढळून आला. खुनाचा कट रचणे, या कलमान्वये पोलिसांनी त्यालाही ताब्यात घेतले. दरम्यान, अटक केलेल्यांमध्ये प्रेम बोबडे (क्य १८) व प्रिन्स भागचंद श्रीवास (१८, रा. विलासनगर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार, यश याने दोन ते तीन महिन्यांपूर्वी यातील एका अल्पवयीनाच्या कारची तोडफोड केली होती. त्याला त्या घटनेचा ल्चपा काढायचा होता. यशला मारण्यासाठी त्याने आपल्या चार मित्रांना सहभागी करवून घेतले. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वीच यशचा वाढदिवस झाला होता.

# नगराध्यक्ष ६, नगरसेवकपदाच्या २२ उमेदवारांनी घेतली माघार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस अगदी २४ तासांवर आला असताना गुरुवारी जिल्ह्यात २८ जणांनी माघार घेतली. यामध्ये नगराध्यक्षांच्या ६ आणि नगरसेवकपदाच्या २२ उमेदवारांचा समावेश आहे. बुधवारच्या पहिल्या दिवशी माघार घेणाऱ्यांची संख्या ७ होती.त्यामुळे आतापर्यंत माघार घेणाऱ्या एकूण उमेदवारांची संख्या ३५ वर पोचली आहे. यामध्ये नगराध्यक्ष पदाच्या ८ अर्जाचा समावेश असून नगरसेवक पदाच्या २७अर्जाचा समावेश आहे. - नगरपालिका प्रशासन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी मोर्शीतील तीन, नांदगाव खंडेश्वर येथील दोन आणि अंजनगाव सुर्जी येथील एकाने नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीतून माघार घेतली.त्याचवेळी अचलपूर येथील सर्वाधिक ५, अंजनगाव सुर्जी व चिखलदरा येथील प्रत्येकी ४, मोर्शीतील ३, धामणगावच्या दोन आणि चांदूर बाजार, दर्यापूर येथील प्रत्येकी एका उमेदवाराने नगरसेवक पदाच्या रिंगणातून स्वतःला बाहेर केले. उद्या, शुक्रवारी हा शेवटचा दिवस असल्याने मोठी संख्या पुढे येऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे



# मोर्शी तालुक्यामध्ये शासकीय कापूस खरेदी केंद्राचे उद्घाटन !

## मोर्शी तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१दापोरी** – मोर्शी तालुक्यात दापोरी हिवरखेड परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी कापूस उत्पादक शेतकऱ्यांतर्फे करण्यात आली होती परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन आजपासून दापोरी हिवरखेड परिसरामध्ये पांडव जिनिंग प्रेसिंग इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड कंपनी येथे सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



केंद्र सरकारच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात येत आहेत. या खरेदी केंद्रांवर शासनाने कापसासाठी ८ हजार ११० रुपये हमीभाव जाहीर केला आहे त्यानुसार खरेदी करण्यात येत असल्यामुळे नक्कीच यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होत आहे.

मोर्शी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात कपाशीचे लागवड होते. परंतु जर आपण यावर्षी कापसाची स्थिती बघितली तर अत्यंत कमी दर मिळत असल्याने कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय हमीभावापेक्षा देखील कमी दराने खाजगी व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. परंतु आता मोर्शी तालुक्यात दापोरी हिवरखेड परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमधून आता आनंद व्यक्त केला जात आहे.

सद्या सुरू आलेल्या कापूस खरेदीमध्ये ८ ते १२ टक्के पर्यंतच्या ओलाव्याचा कापूस सीसीआय तर्फे स्वीकारण्यात येत असल्याचे यावेळी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सांगण्यात आले. दापोरी परिसरामध्ये सीसीआय अंतर्गत कापसाचे खरेदी केंद्र सुरू केल्यामुळे तालुक्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्यामुळे कापूस खरेदी केंद्र सुरू केल्याबद्दल शेतकऱ्यांनी शासनाचे आभार मानले यावेळी कापूस खरेदी केंद्राच्या उद्घाटना प्रसंगी सी सी आय चे अधिकारी अमित उपाध्याय, माजी पंचायत समिती सभापती दीपकराव पांडव, माजी सभापती मोर्शी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव लाभेश लिखितकर, पांडव जिनिंग प्रेसिंग चे संचालक संजय पांडव, संचालिका सौ उज्वलाताई संजय पांडव, सर्जेराव पांडव , रजत पांडव, सौ इंद्रायणी पांडव,ग्राम पंचाय सदस्य रुपेश वाळके, गजानन देशमुख, शैलेंद्र साबळे, पंकज सवाई, अंकुश डोंगरे, रघुनाथभाऊ शहाने, किशोर मोहोड, प्रीतम गायकवाड, विशाल संभावित, विकास कुमार यांच्यासह आदी शेतकरी उपस्थिती होते.

मोर्शी तालुक्यात कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणावर असून यावर्षी कपाशीचे पीक चांगले आले असताना खाजगी व्यापाऱ्यांच्या माध्यमातून मात्र शासकीय हमीभावापेक्षा देखील कमी दराने कापूस खरेदी केला जात असल्याने शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका सहन करावा लागत होता. परंतु आता शासकीय हमीभाव केंद्र सुरू केल्यामुळे खाजगी कापूस खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून देखील कापसाच्या दरात निश्चित वाढ केली जाईल अशी एक शक्यता आहे.

# ट्रक व एसटी बसमध्ये धडक सुदैवाने ३९ प्रवासी बचावले



## बायपास वळणावर अपघाताची मालिका सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१तिवसा** पाहता-पाहता गुरुकुंज मोझरी येथील बायपास वळण हे आता अपघात प्रवण स्थळ बनले आहे.आज सायंकाळी साडेपाच वाजता भरधाव ट्रक ची लालपरी एसटी बसला धडक बसली.ज्यात जवळपास ३९ प्रवासी सुखरूप बचावले अन्यथा मोठी जीवित हानी झाली असती. अमरावती वरून नागपूरच्या दिशेने संभाजीनगर डेपो ची बस क्रमांक चक १४-२३६१ ही नागपूर कडे गुरुकुंज मोझरी बायपास वळणावरून आज गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या दरम्यान ३९ प्रवाशी घेऊन जात असताना त्याचवेळी समोरून नागपूर वरून अमरावतीच्या दिशेने जाणारा ट्रक क्रमांक चक ४८,-ऋ-१६७७ या ट्रकची लालपरी एसटी ला धडक बसली.या धडकेत लालपरीच्या चालकाच्या बाजूचा भाग घासून नुकसान झाले असले तरी याच धडकेत प्रवाश्यांचे जीव देखील गेले असते मात्र सुदैवाने मोठा अनर्थ टळला आणि प्रवाशी सुखरूप बचावले.अपघातानंतर प्रवाश्यानी सुटकेचा श्वास घेतला.घाबरलेल्या अवस्थेत प्रवाशी बाहेर पडले.अपघाताची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला.

# २३ नोव्हेंबर रोजी, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

## राज्यभरातील ४ लाख ७५ हजार ६६९ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती,**
महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (च-क-ढएढ) २०२५चे आयोजन दि.२३ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील ३७ जिल्ह्यातील १ हजार ४२३ जिल्हा मुख्यालयाच्या केंद्रावर करण्यात आले आहे. या परीक्षेच्या आयोजनाच्या कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.

पेपर एकसाठी २ लाख ३ हजार ३३४ उमेदवार व पेपर दोनसाठी २ लाख ७२ हजार ३३५ उमेदवार असे एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवार महाटिईटी परीक्षेला प्रविष्ठ होणाऱ्या परिक्षार्थींची संख्या आहे. पेपर एक साठी ५७१ परीक्षा केंद्र आणि पेपर दोनसाठी ८५२ केंद्र अधिग्रहीत असून संपूर्ण वर्गखोल्या व परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत सुरक्षा तपासणीसाठी मेटर डिटेक्टरच्या सहाय्याने फ्रिसकिंग केले जाणार आहे. तसेच परिक्षार्थींच्या आवेदनपत्राच्या मूळ डाटाबेसशी साधर्म्य तपासण्यासाठी बायोमेट्रीक व फेस रिक्गनीशन तपासणी करण्यात येणार आहे.

सर्व परीक्षा दालनामध्ये, परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर व केंद्र संचालकाच्या कक्षात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्याव्दारे लाईव्ह कास्टींगच्या माध्यमातून सर्व परीक्षा दालनांवर जिल्हा व राज्यस्तरावरून अत्यंत काटेकोरपणे सनियंत्रण ठेवले जाणार आहे. कनेक्ट व्हिूव प्रणालीच्या माध्यमातून प्रत्येक परीक्षा केंद्रसंचालक, परीक्षा संनियंत्रण कक्ष व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद कक्ष यांचेकडे हॉटलाईनचे फोन उपलब्ध असतील सदर सुविधेमार्फत आवश्यकतेनुसार संबंधितांशी संपर्क साधला जाईल व या फोनच्या माध्यमातून दिवसभर नियमितपणे केंद्रसंचालकासाठी विविध सूचना एकाचवेळी निर्गमित करता येतील. दिलेल्या सूचनांचे (ड्ढीरवलरींं) संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध असणार आहे. जेणेकरून महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेमधील पारदर्शकता व विश्वासार्हता कायम राहून परीक्षा शिस्तबध्द पद्धतीने घेण्यात येईल.

परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थी/उमेदवारांनी परीक्षेसंबंधी युट्युब चॅनेल्स, सोशल मिडिया प्लॅटफॉर्मद्वारे व प्रसार माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्या अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ु.ीलर्शीपिश.ळप व ह्रींींिं:// ारहरींशीं.ळप अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना व माहितीचे अवलोकन करावे, असे परिषदेतर्फे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.-

# घरपट्टी जनजागृती आंदोलनाने यावली नगरीं दुमदूमली

## यावली शहीद ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१यावली शहीद ,** येथून जवळच असलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मगाव ग्राम यावली शहीद येथील ग्रामपंचायतच्या वतीने राज्यातील पहिले अभिनव आंदोलन घरकर भरण्यासाठी आयोजित करण्यात आले होते.या आंदोलनामध्ये सरपंच शिल्पा खवले उपसरपंच नितीन पाचघरे ग्राम अधिकारी बैलमारे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य गावकरी सहभागी झाले होते.अनेक दिवसांपासून थकीत असलेले कर गावकऱ्यांनी सवलतीच्या दरात भरून शासनाच्या सवलती योजनेचा फायदा घ्यावा तसेच आपला घरकुल नियमित भरावा याकरता यावली शहीद ग्रामपंचायत अंतर्गत जनजागृती आंदोलन करण्यात आले होते हे राज्यातील पहिले जनजागृती आंदोलन असल्याचे बोलल्या जात आहे यावली शहीद गावातील प्रमुख मार्गाने विविध घोषणा देत ही आंदोलक मंडळी मार्गक्रमण करत होती यावेळी या रॅलीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे वेशभुषाधारण केलेले व्यक्तिमत्व सहभागी झाले होते तर दिव्यांग बांधव सुद्धा या जनजागृती रॅलीमध्ये सहभागी झाले होते ग्रामपंचायतची आर्थिक परिस्थिती सुधारली तरच जोमानं काम करता येते. खरं तर हे सारं गावच्या






हितासाठी आहे. गावात सर्व सुविधा हव्यात मग ग्रामस्थांनी घरपट्टी भरणं महत्वाचं आहे. सर्वात आधी गावातील महिलांची बैठक घेतली. गावाच्या विकासासाठी घरपट्टी भरणं किती महत्वाचं, याबाबत त्यांना समजावून सांगितलं. सरपंच आणि उपसरपंच यांनी देखील या कार्यात उत्साह दाखवला. गावातील अनेकांनी घरपट्टी भरण्यासाठी पुढाकार घेतला. प्रत्येक घरांचा कर वसूल व्हायला हवा, यासाठी गुरुवारी गावातून ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी, सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, शाळेचे विद्यार्थी यांच्यासह गावभर मोर्चा काढला आणि घरपट्टी भरणं किती महत्वाचं आहे, याबाबत ग्रामस्थांना जागृत करण्याचा प्रयत्न केला, असं देखील ललित बैलमारे यांनी सांगितलं.यावेळी सरपंच सौ शिल्पा खवले उपसरपंच नितीन पाचघरे ग्राम अधिकारी ललित बैलमारे ग्रामपंचायत सदस्य योगेश निंभोरकर, ग्रामपंचायत सदस्या निरंजना मेश्राम, माजी सरपंचा अलका दामले ,सामाजिक कर्यकर्ते तुषार खवले, गंगाधर श्रीखंडे ,निलेशा कांडेलकर, सुलभा कांडलकर, सोनाली नागोने, प्रेमाली यावले,भूषण कांडलकर अनिल, किर्तकार, अतुल यावलीकर,भूषण खवले, विलासराव यावले, बाबुराव आसरे,अक्षय भोपळे, गणेश भोपळे,भाष्करराव दामले, बाळा साहेब दामले,मुन्ना खवले,अंकुश घाटोळ,राजूभाऊ बोबडे,अतुल यावले,हर्षल यावले,योगेश नागोने सह सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामवासी सहभागी झाले होते.

### गावाचा विकास हे राष्ट्रसंतांचं स्वप्न

भारतातले ७ लाख गावं विकसित झाली तर देशाचा विकास होईल, असं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणायचे. आज राष्ट्रसंतांच्या जन्मभूमी असणाऱ्या आमच्या यावली शहीद गावातल्या लोकांची गावाच्या विकासासाठीची जबाबदारी ही इतर गावांपेक्षा अधिक आहे, असं गावातील ज्येष्ठ व्यक्ती गंगाधर श्रीखंडे म्हणाले. आजवर गावच्या विकासासाठी ग्रामस्थ अनेकदा एकत्र आलेत. घरपट्टी भरून ग्रामपंचायतला देखील सर्व सहकार्य करतील, असा विश्वास देखील गंगाधर श्रीखंडे यांनी व्यक्त केला.

### गावकऱ्यांनी आपल्याकडे असलेल्या थकीत कराची भरणा नियमित केली पाहिजे

– त्या रकमेतून गावाच्या सर्वांगीण विकासाकरीता उपाययोजना करता येईल शिवाय वसुली करावर आधारित ग्राम विकासाचे कार्य असून जास्तीत जास्त गावकऱ्यांनी तात्काळ कराची भरणा करावी.
**सौं शिल्पा तुषार** खवलेसरपंच – ग्रामपंचायत यावली शहीद

# घरफोडीचे सत्र:बडनेरात पुन्हा चोरट्यांचा उच्छाद

## रात्री चार दुकानांसह घरही फोडले, बडनेरा पोलिसांच्या रात्रगस्तीवरच प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**
शहराचाच भाग असलेल्या बडनेरा व परिसरात मागील पंधरा दिवसांपासून चोरट्यांनी अक्षरश: उच्छाद मांडला आहे. मागील पंधरा दिवसांपासून बडनेरा ठाण्याच्या हद्दीत सातत्याने चारी व घरफोडींच्या घटना घडत आहेत. मात्र बडनेरा पोलिसांना चोरट्यांचा बंदोबस्त करता आलेला नाही. दरम्यान बुधवार ते गुरूवारी मध्यरात्रीदरम्यान बडनेरा शहरातील एकाच ठिकाणी असलेल्या चार दुकानांना चोरट्यांनी लक्ष्य करुन फोडलेले आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळेच बडनेरा पोलिसांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करुन साईनगर भागातील काही सुजान नागरिकांनी गुरूवारी (दि. २०) थेट पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांची भेट घेतली व गस्त वाढविण्याची मागणी केली आहे. बडनेरा नविवस्ती भागातील आठवडी बाजार परिसरात चार दुचाकनांमध्ये चोरी झाल्याचे गुरूवारी सकाळी समोर आले आहे. यामध्ये मुकेश मनोहर दमाई यांचे किराणा दुकान फोडून चोरट्यांनी १ हजार रुपयांचा मुद्देमाल, मनोहर किराणा नामक दुकानातून ३ हजार रुपयांचा, हरिष ट्रेडर्समधून १ हजार रुपयांचा तर रॉयल मार्केटींग नामक दुकानातून ८ हजार रुपयांचा असा चार दुकानातून चोरट्यांनी एकूण पंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या चारही चोरी प्रकरणात पोलिसांनी मुकेश दमाई यांच्या तक्रारीवरुन अज्ञात चोरट्यांविरुध्द एक गुन्हा दाखल केला आहे. तसेच बडनेरा ठाण्याच्या हद्दीतीलच साईनगर भागातील श्री शिवाजीनगरमधील रहीवासी वैभव केशव खंडारे यांच्या घरी चोरट्यांनी चोरी केली आहे. खंडारे हे कुटूंबियांसह १३ ते १८ नोव्हेंबरदरम्यान घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. ते घरी येताच त्यांना घरात चोरी झाल्याचे लक्षात आले. यावेळी चोरट्यांनी खंडारे यांच्या घरातून आठ ग्रॅम व दहा ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, चांदीचे दागिने तसेच रोख ४ हजार असा सुमारे दोन लाखांहून अधिक रकमेचा ऐवज लंपास झाला आहे. मात्र बडनेरा पोलिसांनी ही चोरी ९९ हजार रुपयांची असल्याची नोंद केली आहे. अशाप्रकारे चोविस तासात या पाच चोऱ्या झाल्याचे समोर आले आहे.

**नागरिकांचे पोलिस आयुक्तांना निवेदन**

साईनगर भागातील खंडेलवाल नगर, हरिशांती कॉलनी, फॉरेस्ट कॉलनी, अंबानगरी, अकोली, म्हाडा कॉलनी व संजीवन कॉलनी या भागात चोरी, गाय चोरी आणि घरफोडींच्या घटना वाढल्या आहेत. या मागणीचे निवेदन तुषार भारतीय यांच्या नेतृत्वात गुरुवारी (दि. २०) पोलिस आयुक्तांना देण्यात आले. फेरीवाले, भंगारवाले यांचे प्रमाण या भागात वाढले असून त्यांना ओळखपत्रही देण्यात आले नाही. दरम्यान रात्री चोरीच्या घटना घडतात. या भागात पोलिस बंदोबस्त वाढवून तसेच वेगवेगळी पथके तयार करून चोरीच्या घटनांवर अंकुश लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे घरफोडीचे चोरटे शोधण्यासाठी स्वतंत्र पोलीस पथक तयार करण्यात यावे. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देताना माजी महापौर चेतन गावंडे, प्रशांत शेगोकर, भीमराव गायकवाड, गोपाल दलाल, सुरेंद्र फसगे, रवींद्र भिवापूरकर, मंदान नानोटी, शुभम वैष्णव यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# एचआयव्ही कार्यक्रमांची सर्व स्तरावरून जनजागृती आवश्यक- जिल्हाधिकारी

## भेदभाव होणार नाही, याबाबत काटेकोरपणे काळजी घेण्याची सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–**
एचआईव्ही कार्यक्रमांची सर्व स्तरावरून जनजागृती आवश्यक आहे. कोणत्याही ठिकाणी कोणाचीही बदनामी होणार नाही, कोणालाही कलंक लागणार नाही, तसेच कोणासोबतही भेदभाव होणार नाही, याची काटेकोरपणे काळजी घेण्याचे निर्देश जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती व एचआयव्ही संबंधित सभेत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे तसेच इतर सर्व विभागाचे अधिकारी, सामाजिक संस्था, त्यांचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. या सभेच्या



सुरुवातीला राष्ट्रीय स्तरावरून प्रत्येक जिल्ह्यात सुरू असलेल्या इन्टेन्सिफाइड आयईसी मोहिमेचा आढावा जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे यांनी सादर केला. तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी एचआईव्ही बाबत सर्व स्तरावरून जनजागृती होणे गरजेचे असल्याचे सांगितले व त्या प्रमाणे कार्य करण्याचा सूचना दिल्या.

या सभेमध्ये एचआईव्ही संबंधित घटक जसे एचआईव्ही संक्रमित व्यक्ती, तृतीयपंथी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीया, स्तलांतरित कामगार, ट्रक चालक तसेच त्यांच्यासोबत असलेले सहकारी, यांच्या संदर्भात त्यांचे ओळखपत्र, सामाजिक सुरक्षे अंतर्गत दिल्या जाणाऱ्या योजना देताना जास्त दक्ष असावे आणि जर काही समस्या निर्माण होत असतील तर त्यांचे निराकरण त्वरित करावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सभेच्या अध्यक्ष पदावरून बोलताना सांगितले.

या सभेला शैलेजा एम., जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा नियोजन अधिकारी सीमा भाकरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड, शहरी क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, उप जिल्हा रुग्णालय मोर्शीचे वैद्यकिय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार, पोलिस अधीक्षक कार्यालयाचे देशमुख, प्रकाश शेगोकार, डॉ. रघुनाथ वाडेकर, विद्या तायडे, अंजली देशमुख, ब्रिजेश दळवी, राजेंद्र साबळे, राजेश तुपोने, परमेश्वर मेश्राम, एकता एकळकर, स्वप्नील इंगळे, पी. टी. खडसे, दामोदर गायकवाड, लोकेश पवार, भूषण कावरे महिला बाल कल्याण विभाग इत्यादी हजर होते.

गर्भवती मातांची तपासणी गरजेची या सभेमध्ये सर्व कार्यक्रमाच्या आढ्याव्या सोबतच, जिल्ह्यातील सर्व गर्भवती माता यांची एचआईव्ही तसेच सिफिलिस तपासणी होणे गरजेचे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्र यांनी सर्वांना सूचना दिल्या. तसेच यामध्ये एकही गरोदर स्त्री सुटता कामा नये असेही सांगितले. आजच्या एचआईव्ही स्थितीवर आणि इतर सामाजिक संरक्षण योजनांबद्धल चर्चा केली.

# अमरावतीत काँग्रेस आंदोलनावर पोलिसांची कारवाई; ठाकूरांचा पोलिसांवर संताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१ अमरावती**

कृषिमंत्री दत्तामामा भरणे हे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना चांदूरबाजार-शिराळा मार्गावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन करण्याची तयारी केली होती. मात्र, आंदोलन सुरू होण्याआधीच पोलिसांनी काही काँग्रेस पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईवर काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी पोलिसांवर संताप व्यक्त केला.ठाकूर यांनी पोलिसांनी कार्यकर्त्यांवर



नजरकैद ठेवून वर्दीचा गैरफायदा घेऊ नये, आम्ही घाबरत नाही असा इशारा दिला. ताब्यात घेतलेले कार्यकर्ते त्यांनी स्वतः परत आणल्याचा दावा केला.यादरम्यान, त्यांनी अमरावतीतील आमदार संजय खोडके यांच्यावरही टीका करत अमरावतीत दादागिरी सुरू आहे, महानगरपालिकेची खुली जागा हडपण्याचा प्रयत्न होत आहे असा आरोप केला. संपूर्ण घटनेमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

# जिल्ह्यात २१ हजारांवर लाडक्या बहिणी सापडल्या संकटात

## 'लाडक्यां'ना मिळताहेत अपात्रतेची कारणे: यादीची तपासणी सुरू, महिलांचा रोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकीबहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या जिल्ह्यातील २१ हजार १०६ लाडक्या बहिणी संकटात सापडल्या आहेत. अपात्र असल्याचे कारण देत त्यांना दरमहिन्याला मिळणारे दीड हजार रुपयेही बंद करण्यात आले आहेत. जिल्हा व बालविकास विभागाला ही यादी प्राप्त झाली असून, त्यांची तपासणी करण्यात येत आहे.



विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य शासनाने सुरु केलेली 'लाडकी बहीण योजना' चांगलीच चर्चेत आली. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. मध्य प्रदेशात यशस्वी ठरलेली ही योजना महाराष्ट्रात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेच्या भरवशावर महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. लाडक्या बहिणींचा आशीर्वाद पाठीशी असल्याच्या प्रतिक्रिया अनेक नेत्यांनी दिल्या. त्यानंतर मात्र या योजनेतील पात्र-अपात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण सुरू झाले. यामध्ये कोण पात्र, कोण अपात्र याची छाननी करण्यात येत आहे. यात आतापर्यंत २१ हजार १०६ लाडक्या बहिणी अपात्र असल्याचे पुढे आले. उर्वरित अर्जाची तपासणी सुरू आहे. ज्यांच्याकडे कार असतानाही यादीत नाव आले त्यांची योजनेतून कपात केली आहे. याशिवाय जिल्ह्यात अद्याप ५ हजार ५० महिलांचा शोध लागला नसल्याने या बहिणींचा लाभ बंद केल्याचे महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. अशातच आता ई-केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली असल्याचेही प्रशासकीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

**यामुळे ठरविले अपात्र**

अडीच लाख रुपये कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्या १८ ते ६५ वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ द्यायचा हा सर्वसामान्य निकष होता. मात्र, तिथेच ढील देण्यात आली. बँक खात्याला आधार कार्ड, पॅन कार्ड जोडलेले असावे; किंवा प्राप्तिकर उलाढालीची तपासणी करणे, हे अर्ज खात्याकडून पॅन कार्डवरील आर्थिक मंजूर करतानाच पाहायला हवे होते. केवळ महिलांसाठी असलेल्या या योजनेचा लाभ पुरुषांनी घेतल्याचेही उघड झाले आहे. सरकारी महिला कर्मचारी, निराधार योजनेतील लाभार्थी महिला, ६५ वर्षावरील महिलांनीही या योजनेचा लाभ घेतला.

# मतदारयादीत गोंधळ : नगरपरिषद क्षेत्रात २,३४७ दुबार मतदार आढळल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

जिल्ह्यातील नगर परिषदांमध्ये तब्बल २३४७ मतदारांची नावे दुबार असल्याचे समोर आले आहे. या मतदारांची नावे यादीत चिन्हांकित करण्यात आल्याने मतदानाच्या वेळी या मतदारांना एकाच ठिकाणी मतदान केल्याचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

यापूर्वी प्रारूप मतदार यादीवर १४ हजारांपर्यंत आक्षेप व हरकती दाखल झाल्याने नगरपरिषदांची मतदार यादी चर्चेत आली होती. राज्य निवडणूक आयोगाने २९ ऑक्टोबर रोजी मतदार यादीतील दुबार नावांबाबत करावयाच्या उपाययोजनांसाठी मार्गदर्शन सूचना दिल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासनाकडून देण्यात आली. मतदार नोंदणीचे वेळी काहीमतदारांनी ऑफलाइन नमुना अर्ज दिला, तर त्याच मतदाराने ऑनलाइनदेखील मतदार नोंदणी केली. शिवाय राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही या मतदाराची नमुना अर्ज भरून नोंदणी केल्याने यादीत दुबार, तिबार व चारवेळा नावे आल्याची माहिती आहे. यावर प्रशासनाकडून नेमकी कुठली उपाययोजना केली जाते, ते पाहणे औत्सक्तेचे ठरणार आहे.



**अचलपूर नगरपरिषदेमध्ये १३ मतदार तिबार**

अचलपूर नगरपरिषदेच्या मतदार यादीमध्ये सर्वाधिक १३ नावे तब्बल तीनवेळा आलेली आहे. धामणगाव ३ तर अंजनगाव सुर्जी, चांदूर रेल्वे, चांदूरबाजार व नांदगाव खंडेश्वर येथे प्रत्येकी दोन मतदारांची नावे यादीत तीन वेळा आलेली आहे. अचलपूर व नांदगाव खंडेश्वर येथे प्रत्येकी २ व वरुड १ अशी ५ मतदारांची नावे चार वेळा नोंद आहे.

**अचलपूर,वरुड मध्ये सर्वाधिक मतदार**

मतदार यादीत सर्वाधिक ३६० दुबार मतदार वरुड तर ३४४ अचलपूर व ३१२ मोर्शी नगरपालिकेत आहेत.याशिवाय अंजनगाव सुर्जी येथे १६६, दर्यापूर २२८, चांदूर रेल्वे ८२, चिखलदरा ३, चांदूरबाजार ३९, शेंदूरजना घाट ८९, धामणगाव २०६, नांदगाव खंडेश्वर ७६ तर धारणी नगर पंचायतीच्या मतदार यादीत १३२ मतदारांची नावे दुबार असल्याची माहिती आहे. त्याला प्रशासनाने दुजोरा दिला.

# बांधकाम कामगार नोंदणी नि:शुल्क, मध्यस्थींना पैसे देऊ नका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती,**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत अमरावती जिल्ह्यातील १८ ते ६० वयोगटातील बांधकाम कामगारांसाठी नोंदणी, नूतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम निरंतर सुरू आहे. कामगार उप आयुक्त कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया ारहरलेलु.ळप या संकेतस्थळाद्वारे नि:शुल्क ऑनलाईन पद्धतीने केली जाते. मागील बारा महिन्यांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेल्या व्यक्ती नोंदणीसाठी पात्र आहेत. अस्थायी स्वरूपाचे काम करणाऱ्या कामगारांसाठी ग्रामसेवक किंवा महानगरपालिका, नगरपरिषदेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडून १० दिवसांचे प्रमाणपत्र मिळू शकते. नोंदणी व लाभासाठी जिल्ह्यातील बांधकाम कामगारांकडून मध्यस्थीमार्फत पैशांची मागणी केली जात आहे. यावर विभागाने स्पष्ट केले आहे की, कार्यालयाचा कुठल्याही बाहेरील दलालांशी संबंध नाही आणि कुठलेही अतिरिक्त रक्कम आकारली जात नाही. जिल्ह्यातील कुठल्याही व्यक्तीने किंवा अधिकारी, कर्मचाऱ्याने पैशांची मागणी केल्यास, कामगारांनी त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा लाच लुचपत प्रतिबंधक विभागास रितसर तक्रार नोंदवावी. यामुळे कामगारांची फसवणूक होणार नाही. सर्व कामगारांनी www.mahabocw.in वर नोंदणी, नूतनीकरण करावे आणि मालक, ठेकेदारांनी देखील 'आपले सरकार' पोर्टलवर नोंदणी करून कामगारांना नियोक्ता प्रमाणपत्र द्यावे, असे आवाहन कामगार उप आयुक्त, अमरावती यांनी केले आहे.

# मालेगावच्या चिमुकलीवर अत्याचार व हत्येचा अमरावतीत तीव्र निषेध

## आरोपीला तात्काळ फाशीची YSP-BJP ची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावातील साडेतीन वर्षांच्या चिमुकली यज्ञा हिच्यावर झालेला अमानुष अत्याचार आणि निर्घृण हत्येच्या घटनेने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या विकृत कृत्याचा भारतीय जनता पार्टी आणि युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने आज अमरावतीतील राजकमल चौक येथे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. धडझ चे मार्गदर्शक सुनील राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत यज्ञा या चिमुरडीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून आरोपीला तातडीने फाशी देण्याची मागणी करण्यात आली.

शवविच्छेदन अहवालानुसार चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचे आणि तिच्या डोक्यात वर्मी घाव केल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे राज्यातील महिलांच्या व मुलींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असल्याचे पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. समाजात वाढलेली असुरक्षिततेची भावना, पालकांचा वाढलेला भीतीचा वातावरण या सर्वांवर कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे, असे यावेळी वक्त्यांनी नमूद केले.

जर या निष्पाप चिमुरडीला न्याय मिळाला नाही तर आपण समाज म्हणून नापास ठरू, अशी भावना व्यक्त करत धडझ व इगझ पदाधिकाऱ्यांनी आरोपीला जलद गती न्यायालयात खटला चालवून त्वरित फाशी देऊन समाजासमोर कठोर उदाहरण उभे करण्याची मागणी केली. या संदर्भातील निवेदन सरकार व प्रशासनाला तत्काळ देण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

श्रद्धांजली कार्यक्रमास अशोक पांडे, सुनील खराटे, सचिन भेंडे, गणेशदास गायकवाड, नितीन बोरेकर, ज्योति सैरिसे, अर्चना तालान, अविनाश काळे, राजा बागडे, कमल किशोर मालानी, पराग चीमोटे, मिलिंद कहाड़े यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. मुली-महिलांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरावर तातडीच्या व प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# शाळेमध्ये नाव अन् जन्मतारीख चुकली; कशी करायची दुरुस्ती?

## विद्यार्थ्यांना मनस्ताप, आकडे बदलाच्या चुकांमुळे शालेय रेकॉर्डमध्ये चुका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

शालेय रेकॉर्डमध्ये बर्याचदा विद्यार्थ्यांची नावे किंवा जन्मतारखा चुकतात भविष्यात यामुळे पुढील शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विद्यार्थ्यांचे प्रवेश अडतात. विविध लाभांपासून विद्यार्थी वंचित राहतात. आता तर विद्यार्थी आधार व टीसीत फरक असेल तर विद्यार्थ्यांचे नावदेखील शाळा रेकॉर्डवरून कमी होते.



नावावरून विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होऊ नये, म्हणून दुरुस्तीसाठी शाळेमार्फत शिक्षण विभागाकडे कागदपत्रांसह प्रस्ताव सादर केला जातो. पहिली ते दहावीपर्यंतच नावात किंवा शैक्षणिक नोंदीत बदल करता येतो. या दुरुस्तीवरून पुढील शिक्षणाचा रेकॉर्ड दुरुस्त करण्याची तरतूद आहे.शाळेच्या नोंदणीदरम्यान झालेल्या विद्यार्थ्यांच्या नावाच्या स्पेलिंगमधील बदलामुळे किंवा जन्मतारखेतील आकडे बदलाच्या चुकांमुळे शालेय रेकॉर्डमध्ये चका होतात.

**रेकॉर्डमध्ये बदलाची पद्धत आणि कागदपत्रे कोणती?**

विद्यार्थ्यांच्या रेकॉर्ड मध्ये चुका झाल्या असल्यास मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, वर्तमानपत्रातील प्रकाशनाचे कटिंग, राजपत्र अधिसूचनेची प्रत, अपडेटेड सरकारी ओळखपत्र, फोटो, अर्ज अशी कागदपत्रे जोडून चुका दुरुस्तीचा प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करावा लागतो.

**कुठे आणि कसा अर्ज सादर करायचा?**

शैक्षणिक रेकॉर्डमध्ये चुका असल्यास दुरुस्तीसाठी शिक्षण विभाग, परीक्षा बोर्ड किंवा विद्यापीठाकडे अर्ज करता येतो. याची माहिती शाळेत किंवा शिक्षण विभागातही विद्यार्थ्यांना मिळू शकतो.

# बौद्ध धर्माचे पालन करतो, पण..., आज जो काही आहे तो...; निवृत्तीपूर्वी न्यायमूर्ती बीआर गवई यांचं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली**

आपण बौद्ध धर्माचे पालन करतो, मात्र कोणत्याही धर्माचे सखोल अध्ययन केलेले नाही. आपण धर्मनिरपेक्ष असून हिंदू, शीख, मुस्लीम, ख्रिश्चन आदी सर्व धर्मांवर आपला विश्वास आहे, असे भारताचे मुख्य न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी म्हटले आहे. ते सुप्रीम कोर्ट डव्होकेट्स-ऑन-रेकॉर्ड असोसिएशन तर्फे आयोजित निरोप समारंभावेळी बोलत होते.

मुख्य न्यायमूर्ती गवई म्हणाले, ही विचारसरणी आपल्याला आपल्या वडिलांकडून मिळाली, जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी होते. गवई यांनी स्पष्ट केले की, कुटुंबात कोणत्याही दर्ग्याची माहिती मिळाली की, तेथेही ते जात असत. आपल्यासाठी धर्मापेक्षाही माणुसकी आणि संविधान अधिक महत्त्वाचे आहे.



आपला हा संपूर्ण प्रवास संविधान आणि डॉ. आंबेडकरांमुळेच शक्य झाला. मी आज जो काही आहे, तो याच संस्थेमुळे (सुप्रीम कोर्ट) आहे. एका महानगरपालिकेच्या शाळेत जमिनीवर बसून शिकणारा मुलगा, इथवर पोहोचू शकेल, असा विचार करू शकत नव्हता. आपण नेहमीच, न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या संविधानाच्या चार मूल्यांचे पालन करण्याचा प्रयत्न केला, असेही गवीई म्हणाले. ते २३ नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहे. २२ नोव्हेंबर हा त्यांचा सुप्रीम कोर्टातील कामकाजाचा शेवटचा दिवस असेल.

**सुप्रीम कोर्ट ही व्यक्ती-केंद्रित संस्था असता कामा नये**

गवई पुढे म्हणाले, सुप्रीम कोर्ट ही व्यक्ती-केंद्रित संस्था असता कामा नये. मी कधीही एकट्याने निर्णय घेतले नाहीत. प्रत्येक निर्णय संपूर्ण कोर्ट आणि सर्व न्यायाधीशांच्या सहभागातून घेतला गेला. सुप्रीम कोर्ट एक मोठी संस्था आहे आणि यात न्यायाधीश, वकील, रजिस्ट्री आणि कर्मचारी हे सर्व समान महत्त्वाचे आहेत.

# हिवाळी अधिवेशनावर संकट, ठेकेदारांचा कामबंदचा पुन्हा इशारा; मागचे १५० कोटी रूपये थकीत,मिळाले फक्त २० कोटी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नागपूर**

येत्या ८ डिसेंबरपासून सुरू होणार्या विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या तयारीला मोठा धक्का बसला आहे. मागील वर्षी झालेल्या कामांचे १५० कोटी रूपये थकित असताना सरकारकडून फक्त २० कोटी रूपये वाटप झाल्यामुळे नाराज ठेकेदारांनी हा मोठा विनोद असल्याचे सांगत शुक्रवारपासून कामबंद आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. परिणामी, सार्वजनिक बांधकाम विभागासमोर १ डिसेंबरची डेडलाइन गाठण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.



मागील हिवाळी अधिवेशन कामांचे १५० कोटी रूपयांची थकबाकी आहे. आगामी अधिवेशनासाठी सुद्धा ९३.८४ कोटींच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. महिन्याच्या सुरुवातीला ठेकेदारांनी अनेक दिवस कामबंद ठेवले होते. त्यानंतर पीडब्ल्युडी आणि राज्य सरकारने आश्वासन देत सांगितले की थकबाकी लवकरच मिळेल. मात्र गुरुवारी पीडबल्युडीला या खात्यातून फक्त २० कोटी रूपये मिळाले.

या घडामोडीमुळे ठेकेदारांच्या आपत्कालीन बैठकीत कामबंदचा निर्णय घेण्यात आला. नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी रविभवन, विधायक निवास, हैदराबाद हाऊस, देवगिरी येथे सुरू असलेली कामे तत्काळ बंद करण्याचे आवाहन केले.

त्यांनी सांगितले की, मुख्य अभियंता संभाजी माने, अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे आणि कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत राऊळकर यांच्या आश्वासनावर ठेकेदारांनी पूर्वी आंदोलन मागे घेतले होते, पण प्रत्यक्षात फक्त आश्वासनच मिळाले. आता मिळालेले २० कोटी रूपये म्हणजे उंटाच्या तोंडातील जीरे. यामधून वीज, पाणी आदींचे बिलही भागवावे लागणार आहेत.

बैठकीत संजय मैंद, संजय गिल्लोरकर, शिरीष गोडे, महेंद्र कांबळे, राकेश असाठी, अनिकेत डांगरे, रुपेश रणदिवे, राजीव भांगे, प्रशांत जाणे, संभाजी जाधव, प्रशांत मड्डीवर, दिलीप टिपले, मुकुल साबळे, दिनेश मंत्री, अतुल कलोती, बिपिन बन्सोड, प्रशांत पांडे, पी. एन. नायडू, अनिल शंभरकर, नरेश खुमकर आदी उपस्थित होते.

# राजकीय पक्षांच्या आधी पक्षी मैदानात अमरावतीत सहा पंखधारी उमेदवारांची निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**


महापालिकेच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते कामाला लागलेले असताना महापालिकेच्याच पुढाकारातून त्याआधी अनोखी निवडणूक होत आहे. माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत महापालिका आणि वाईल्डलाईफ कन्झर्वेशन सोसायटी (डब्ल्यूईसीएस) यांच्या संयुक्त सहकार्यातून अमरावती 'शहराचा पक्षी' (सिटी बर्ड) निवडला जाणार आहे. त्यासाठी अमरावतीकरांना मत नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने हे पाऊल उचलले आहे. अमरावती 'शहराचा पक्षी' निवडण्याची प्रक्रिया मंगळवारी १८ नोव्हेंबरपासून सुरू झाली आहे. अमरावतीकरांना ऑनलाइन मतदानाद्वारे आपल्या पसंतीच्या पक्ष्याची निवड करण्याचे आवाहन आयक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

अमरावती शहराच्या ओळखीशी सुसंगत आणि येथील पर्यावरणात सहज आढळणाऱ्या सहा पक्ष्यांची नावे उमेदवारीसाठी जाहीर करण्यात आली आहे. हे पक्षी अमरावती शहराच्या जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करतात, हे विशेष.

### अनोखी संधी



शहराचा पक्षी निवडण्याची ही एक अनोखी संधी आहे. ऑनलाइन पोर्टलवर जाऊन पसंतीच्या 'शहराच्या पक्ष्या'ला मत द्यावे आणि या ऐतिहासिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा.

**– सौम्या शर्मा चांडक आयुक्त.**

**हे पक्षी आहेत उमेदवार**

भारतीय राखी धनेश (इंडियन ग्रे हॉर्नबिल)

तांबट (कॉपरस्मिथ बार्बेट)

भारतीय हूदहूद (इंडियन हुपो)

पिंगळा (इंडियन आऊलेट)

शिक्रा भारद्वाज (ग्रेटर कूकल)

**मतदान वेळापत्रक, आवाहन**

मतदान कालावधी : १८ ते २८ नोव्हेंबर

निकाल घोषणा : ३० नोव्हेंबर २०२५

मतदानासाठी ऑनलाइन पोर्टलची लिंक महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# फायर ब्रिगेड कर्मचाऱ्याची आत्महत्या परिवाराने केला चक्का जाम आंदोलन

## त्रास देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची होती मागणी

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२१अमरावती**

अमरावती महानगर पालिकेतील अग्निशमन विभागाच्या बडनेरा झोनमध्ये कार्यरत राजेश वासुदेव मोहन (वय ५५) यांनी वरिष्ठांच्या सततच्या मानसिक छळाला कंटाळून गुरुवारी विष घेऊन आत्महत्या केली.

फायरमन राजेश वासुदेव मोहन यांनादलातील अधीक्षक संतोष केंद्रे व लक्ष्मण पावडे गत तीन ते चार वर्षापासून सातत्याने त्रास देत होते, असा राजेश मोहन यांचा आरोप आहे. ते एमआयडीसी येथील फायर ब्रिगेडच्या कॉर्टरमध्ये राहत होते. ते कॉर्टर खाली करून देण्याचा तगादा त्यांनी होता तसेच ते कामावर असतानाही त्यांची गैरहजेरी लावणे, वरिष्ठांकडे तक्रारी हाअशा प्रकारे मानसिक छळ करीत असल्याचे त्यांनी मृत्यूपूर्वी आपल्या परिवारास सांगितले होते.आज दुपारच्या सुमारास राजेश च्या परिवारातील नातेवाईक,व परिसरातील नागरिकांनी इर्विन चौकात जोरदार चक्का जाम करत केंद्रे,पावडे,व सावकार यांच्यावर तात्काळ ओट्रेसिटी चागुन्हे दाखल करण्याची मागणी केली रस्त्यावर





वाहतूक जाम झाल्यामुळे प्रचंड गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी राजेश मोहन यांच्या परिवाराची समजूत काढण्याचा प्रयत्न केला मात्र राजेश मोहन चा परिवार काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते अखेर पोलिसांनी केंद्रे,पावडे,व खाजगी सावकार याच्या विरुध्द आक्रसिटी चा गुन्हा व निलंबनाचे पत्र महानगर पालिकेकडे पाठवण्याची प्रक्रिया सुरू केल्यानंतर चक्का जाम आंदोलन मागे घेण्यात आले.

# बिनविरोध विजयानंतर......आल्हाद कलोती म्हणालेत फडणवीसांच्या विकासदृष्टीवर जनतेचा ठाम विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१चिखलदरा**

चिखलदरा नगरपरिषदेतून बिनविरोध नगरसेवक म्हणून निवड झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती यांनी प्रथमच प्रतिक्रिया व्यक्त केली. चिखलदरा परिसर मुख्यमंत्री फडणवीस साहेबांना चांगला परिचित आहे. त्यांनी या प्रदेशाला वारंवार भेट देत विकासकामांना गती दिली आहे. त्यामुळे जनतेला खात्री होती की त्यांच्या विकासाभिमुख भूमिकेसोबत राहिल्यास चिखलदऱ्याचाही सर्वांगीण विकास जलदगतीने होईल, असे कलोती यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, त्यांच्या



विरोधात उभे असलेले उमेदवारदेखील आपापले अर्ज मागे घेतल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली. हा एक सामूहिक आणि अभिनव निर्णय आहे. विरोधात उभे असलेले सर्व उमेदवार एकमताने मागे हटले आणि मला बिनविरोध निवडून दिले. हा निर्णय चिखलदऱ्याची विकासाभिमुख भूमिका संपूर्ण महाराष्ट्रासमोर अधोरेखित करणारा आहे, असे कलोती म्हणाले. चिखलदऱ्यातील जनता विकासाला प्राधान्य देते आणि ती मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विकासकेंद्रित धोरणाशी सहमत असल्याचा संदेश या निकालातून स्पष्ट होतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. पुढील काळात चिखलदऱ्याच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# सपकाळांना चिखलदऱ्याचा अभ्यासच नाही- आ. रवि राणा

## यशोमती ठाकुर यांच्यावरही केली टिका; राणा यांच्या टीकेला यशोमती ठाकुरांचे प्रउत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

आमदार रवी राणा यांनी काँग्रेस आणि त्यांच्या नेतृत्वावर जोरदार टीका केली. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत हे काँग्रेसच्या लोकांनाही माहीत नाही, असे म्हणत त्यांनी त्यांच्या नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चिखलदऱ्याच्या गरजांचा त्यांना अभ्यास नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

रवी राणा यांनी सांगितले की, देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून चिखलदऱ्याचा विकास सुरू झाला असून तो अधिक वेगाने व्हावा यासाठी काँग्रेसच्या उमेदवारांनी चर्चा करून भाजप उमेदवार अल्हाद कलोती यांना पाठिंबा दिला. तसेच काँग्रेसच्या नऊ ते दहा उमेदवारांपैकी अनेक जण चिखलदऱ्यात नसल्याची टीकाही त्यांनी केली.काँग्रेसच्या उमेदवारांना सन्मानाने भाजपमध्ये घेतले जाईल, असे ते म्हणाले. चिखलदऱ्यात काँग्रेसच्या तिकीटावर कोणी लढायला तयार नाही, असा दावा त्यांनी केला. तसेच माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्यावरही त्यांनी टीकास्त्र सोडत, त्यांनी बिहारमध्ये प्रभारी म्हणून





दिवा लावला नाही, असा खोचक आरोप केला.

ठाकूर मंत्री असताना आम्ही हनुमान चालीसा म्हटली म्हणून आम्हाला १४ दिवस जेलमध्ये टाकलं. त्या वेळी त्यांना दादागिरी दिसली नाही, असे रवी राणा म्हणाले.काँग्रेसचे उमेदवार लोकशाही पद्धतीने भाजपकडे येत असल्याचा दावा करत, सपकाळ व ठाकूर यांनी आत्मचिंतन करावे, असे आवाहन त्यांनी केले.तर आ राणा यांच्या टीकेला काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी उत्तर देत जोरदार शब्दात टीका करत हल्लाबोल केला. आमच्या भावाला जोग मारायची सवय आहे नाटक, नौटंकी सगळे प्रकार करायची सवय आहे, अशा शब्दांत त्यांनी रवी राणांवर शाब्दिक प्रहार केला.रवी राणा कोणत्या पक्षात आहेत हे त्यांनीच ठरवावे, अशी टोलेबाजी करत ठाकूर म्हणाल्या, आजची वस्तुस्थिती अशी आहे की भाजपने संपूर्ण अमरावतीचा पक्ष राणा दाम्पत्याच्या खुट्याला बांधून ठेवला आहे.तसेच त्या म्हणाल्या की, रवी राणा करत असलेली गुंडांगीरी जनतेला अजिबात पसंत नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही त्यांनी अप्रत्यक्ष निशाणा साधत म्हटले, आदरणीय मुख्यमंत्री यांनी अख्खा अमरावतीचा पक्ष राणा दाम्पत्याच्या खुट्याला बांधला आहे.पुढे बोलताना त्यांनी रवी राणा आणि नवनीत राणा यांच्या भवितव्याबाबतही टिप्पणी केली. काळ्या दगडावरची पांढरी रेष म्हणताय पण माझी पांढऱ्या दगडावरची काळी रेष अशी आहे की, भाजपचा तुमचा उपयोग संपला की भाजप तुम्हाला फेकून देईल, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# TET परीक्षेसाठी अमरावती पोलिसांचा कडक बंदोबस्त

## परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात निर्बंध लागू; परीक्षा केंद्राजवळ टेलिफोन बूथ, झेरॉक्स केंद्र, संगणक सेवा केंद्रे राहणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता **(TET)** परीक्षा-२०२५ ही दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहे. अमरावती पोलीस आयुक्तालय हद्दीत या परीक्षेसाठी गाडगे नगर, कोतवाली, राजापेठ,



बडनेरा, नागपुरी गेट, नांदगाव पेठ आणि फेजरपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण ३५ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आली आहे.

परीक्षा सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी अमरावती पोलिसांनी धारा १६३ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३) अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही नागरिकांची अनावश्यक वर्दळ, जमाव, वाहनांची गर्दी तसेच शांतता भंग होईल अशा हालचालींवर बंदी घालण्यात आली आहे. केवळ परीक्षार्थी, परीक्षा संबंधी कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचारी आणि शासनमान्य व्यक्तींनाच या परिसरात प्रवेश दिला जाणार आहे.

परीक्षा केंद्राजवळ टेलिफोन बूथ, झेरॉक्स केंद्र, संगणक सेवा केंद्रे, खाद्य स्टॉल, फेरीवाले यांना परीक्षा संपेपर्यंत व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्राजवळ राहणाऱ्या रहिवाशांच्या वैयक्तिक वाहनांना मात्र सूट दिली आहे.सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२३ तसेच प्रचलित कायद्यांनुसार कारवाई करण्यात येईल. पोलिसांनी सर्व नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

# शालेय पोषण आहारातून केळी, अंडी गायब; तांदूळ,डाळ, कडधान्यांवर भर

## थंडीत अंड्यांची उणीव भासत असल्याने चर्चेला फुटले पेव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

शालेय पोषण आहार योजनेचे नाव आता 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना' असे झाले आहे. या योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना पोषक आहारासाठी वापरल्या जाणाऱ्या धान्याचा दर्जा राखण्यावर जिल्हा परिषद प्रशासनाने भर दिला आहे. दरम्यान, या पोषण आहारातून अंडी आणि केळी मात्र गायब झाले आहेत. सध्या थंडी चांगली पडू लागल्याने अंड्यांची उणीव भासत असल्याने चर्चेला पेव फुटले आहे.

मागील शैक्षणिक वर्षात शालेय पोषण आहारात अंड्यांच्या समावेशाबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी जातीने लक्ष घातले होते. शिक्षकांच्या व्हॉट्सअँप ग्रुपवर त्याबाबत नित्यनेमाने चर्वितचर्वण होत असे. शाकाहारी विद्यार्थ्यांना केळी तर अन्य विद्यार्थ्यांना अंडी दिली जात असत; परंतु २०२५ –



२६ या शैक्षणिक वर्षात मात्र आहारात बदलण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दोन आठवड्यांचा मेनू तयार केला असून सोयावडी आवर्जून दिली जाते.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सुधारीत पाककृती बदलाबाबत स्वतंत्र निर्देश देण्यात आले असून आठवड्याचे वेळापत्रक ठरवून देण्यात आले आहे. 'श्री अन्न' म्हणून मान्यता प्राप्त डाळ व कडधान्याबरोबरच तांदळाचा त्यात समावेश आहे. प्रत्येक सोमवारी भाज्यांसह पुलाव, मंगळवारी मुग शेवग्याचे वरण आणि भात, बुधवारी मटार पुलाव, गुरुवारी चवळीची खिचडी, शुक्रवारी मसुली पुलाव आणि शनिवारी सोयाबीन पुलाव देण्यात येत आहे.

# पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करावेत-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ अमरावती**

फोटोएकाच प्रकल्पावर दोन निधी उपलब्ध होऊ नयेत, यासाठी पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करण्यात येत आहे. यावर्षी हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावरील असला तरी पुढील वर्षीपासून याचा उपयोग करणे आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे बांधकाम आणि कार्य करणाऱ्या कार्यालयांनी पायाभूत सुविधांचे युनिक आयडी तयार करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.जिल्हा नियोजन सभागृहात आज आढावा बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक अर्जूना के. आर., निता कट्टे, आदर्श रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते. बैठकीत यावर्षीच्या स्पीलचा निधीबाबत आढावा घेण्यात आला. स्पीलच्या निधी मागणी बाबत तातडीने आढावा घेण्यात यावा. काम करणाऱ्या यंत्रणांकडून स्पीलच्या निधीची मागणी घेऊन कार्यान्वयन यंत्रणांनी नियोजनकडे तात्काळ सादर करावी. यामुळे गेल्या दोन वर्षांपासूनची कामे पूर्ण होण्यास मदत होईल. अद्यापही प्रशासकीय मान्यता घेतलेली नसलेल्या विभागांनी येत्या आठ

### पुरस्कारप्राप्त गणेशोत्सव मंडळांचा सत्कार



दिवसांत परिपूर्ण प्रस्ताव निधी मागणीसह सादर करावा. येत्या काळात निवडणूक असल्याने प्रशासकीय मान्यता देण्यास अडचण येणार आहे. त्यामुळे प्रशासकीय मान्यता तातडीने घेण्यात याव्यात. लोकप्रतिनिधींनी कार्यालयाला दिलेल्या पत्रावर तातडीने कार्यवाही करावी. पत्रावर केलेली कार्यवाही तातडीने संबंधित लोकप्रतिनिधींना कळवावी. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संवाद कक्षातर्फे कळविण्यात आलेल्या पत्रावर तातडीने कार्यवाही करून कळवावे. येत्या वर्षापासून पायाभूत सुविधांचा युनिक आयडी तयार करावा लागणार आहे. त्यामुळे लॉगीन आयडी तयार याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. यावेळी जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाबद्दल एकविरा गणेशोत्सव मंडळ, अमरावती, द्वितीय क्रमांक बद्दल बाल गणेशोत्सव मंडळ, साऊर, ता. भातकुली, तृतीय क्रमांक बद्दल राजे वीर संभाजी मंडळ, चांदुर रेल्वे, तालुकास्तरीय प्रथम क्रमांक बद्दल लोकमान्य उत्सव समिती, शिंदी बु., ता. अचलपूर गणेशोत्सव मंडळांचा सत्कार करण्यात आला. तसेच युनिक आयडी तयार करण्याबाबत सादरीकरण करण्यात आले.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत